# ‘दादा’ पर्वाचा अंत!

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशिम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर(ठाणे), नाशिक, चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper:www.epaper.dainikmahasagar.in ● nagpurpost@gmail.com●mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक २०६ * | * अकोला * | गुरुवार, दिनांक २९ जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर / मुंबई, दि. २८ :

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार (६६) यांचे निधन झाले आहे. बुधवारी सकाळी बारामती येथे प्रचार सभेसाठी जात असताना त्यांना घेवून जाणारे विमान कोसळले. बारामती विमानतळावर लँडिंग दरम्यान हा अपघात झाल्याचे वृत्त आहे. विमानात त्यांच्यासोबत असलेले त्यांचे वैयक्तिक सहाय्यक, सुरक्षा कर्मचारी आणि विमान कर्मचाऱ्यांचाही मृत्यू झाला. या घटनेने अख्खा महाराष्ट्र हादरला असून, देशभरातून शोक व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे राज्य सरकारने २८ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. या काळात सर्व शासकीय कार्यालयांवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकवला जाईल.दरम्यान, बुधवारी सकाळी अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याचे समजताच राज्यभरातून नेते बारामतीत पोहचले असून, त्यांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठान येथे नेण्यात आले आहे. गुरूवारी सकाळी ९ पर्यंत अंत्यदर्शनासाठी पार्थिव तेथे ठेवण्यात येणार असून, त्यांच्या पार्थिवावर गुरूवारी सकाळी ११ वाजता बारामती येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## असेही दादा




महाराष्ट्राच्या राजकारणातील धुरंधर अजित दादा स्वर्गाच्या वाटेने गेले. त्यांची शिस्त, त्यांचा लोकसंग्रह, स्पष्टवक्तेपणा वगैरे वगैरे सर्वांनाच ठाऊक आहे, किंबहुना तो प्रसिद्ध आहे. पण दादा व्यक्ती म्हणून कसे होते, त्यांनी कुणाकुणावर कशीकशी माया केली. याची जी काही माहिती आमच्या जवळ आहे त्यावरून दादांचे वेगळेपण इतरांपेक्षा ठळकपणे नक्कीच उठून दिसते. दादांच्या जवळ महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची समय मर्यादा व पायाभूत महाराष्ट्राच्या विकासाची पायवाट, शंकराव चव्हाण यांची शिस्त, काका शरदचंद्र पवार यांचा लोकसंग्रह, महाराष्ट्राचे विद्वान मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची निरीक्षण व आकलन शक्ती, बॅरिस्टर अंतुले यांची धडाडी आणि इतर अनेक गुण त्यांना राज्यकर्ता म्हणून वेगळ्याच चरित्राचा नेता ठरवितात. दादा कुटुंबात कसे वागत याची निरीक्षणे मन हेलावणारी आहेत. दादा कुठेही असले तरी काठेवाडी या आपल्या परंपरागत म्हणजेच मूळ गावात राहणाऱ्या आईला नित्यनेमाने भेटत असत. अजित आला नाही तर त्यांची पुत्रवेडी आई आजारी पडत असे आणि आपला दादा आला की अजित दादांच्या आईचा आजार कुठल्या कुठे पळून जाई. आज त्या आईचा पोरकेपणा कसा भरून निघणार? आईला भेटायला जाताना काठेवाडी मधल्या शाळेतील मुलांसाठी खाऊ घेऊन जाणे हा त्यांचा परिपाठ होता. त्या बालकांचे आजोबा आणि गावकऱ्यांचे परममित्र अजितदादा आता त्यांना कुठे भेटणार? दादांच्या शेतातील गाई त्यांच्या प्रेमापाई आता कुठे आणि कशा धावून येतील. दादा त्या गाईंना यमुना आणि सरस्वती या नावाने हाका मारायचे आणि त्या गाई वात्सल्याने पळत पळत दादांच्याकडे यायच्या. आपल्याकडे काम करणाऱ्या निष्ठावंतांना दादांनी भरभरून प्रेम दिले. त्यांच्याकडे सध्या संपत जाधव नावाच्या सालदाराची दुसरी पिढी निष्ठेने काम करीत आहे. हनुमंतराव पाटील नावाचे त्यांचे निकटवर्ती सहकारी जणूकाही दादांचे अविभाज्य अंग बनलेले आहेत. आपल्या माणसांना जोडणे आणि त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करणे हा दादांचा गुण होता. आपला पुत्र पार्थ पवार याला उपदेश देताना दादांनी, 'कुणावरही आंधळा विश्वास टाकू नकोस. काळजीपूर्वक माणसे निवड' अशी शिकवण दिली होती. त्यांनी जसे आईवर प्रेम केले तसेच प्रेम पत्नी म्हणून सुनेत्रा ताईंवरही केले. बहिणीने बायकोचा पराभव केल्यावर त्यांनी जिद्दीने सुनेत्रा ताईंना बहिणीसारखेच खासदार पद मिळवून दिले. बहीण पाच वर्षांसाठी खासदार आहे तर बायको सहा वर्षांसाठी खासदार आहे. दादांनी आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला संरक्षण देणाऱ्या वॉचमनांवरही कौटुंबिक प्रेम केले. दुसऱ्यांदा उपमुख्यमंत्री होत असताना त्यांचा वॉचमन असलेल्या माणसाच्या मुलाच्या लग्नात दादांनी हजेरी लावून आशीर्वाद दिले होते. बारामतीच्या घरी जो वॉचमन होता, त्याच्या मुलाच्या बारशाला हक्काने हजेरी लावून आपले त्याच्या विषयीचे प्रेम दादांनी व्यक्त केले होते. पुण्यातील एका वॉचमेनचे वडील वारले त्यांच्या अंत्यसंस्काराला हजर राहून त्या वॉचमनला त्यांनी सांत्वना दिली. वास्तविक इतक्या मोठ्या पदावरील व्यक्तीने साध्या फोनद्वारे किंवा एखादी भेटवस्तू पाठवूनही काम साधले असते. मात्र या हळव्या मनाच्या माणसाने तेच कार्य किती प्रेमाने केले याचे हे उदाहरण खरोखर पाहण्यासारखे आहे. आपल्यासाठी काम करणाऱ्या माणसांच्या सोबत त्यांनी केलेल्या जपणुकीची अनेक उदाहरणे आहेत. ज्यांच्यावर दादांनी प्रेम केले. त्या सर्वांसाठी दादांनी शक्य तेवढ्या सर्व बाबी कायद्यात बसवून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या अकाली निधनाने अनेक सामान्य आणि असामान्य जनांच्या डोळ्यात अश्रूंचा पूर असाच वाहत नाही. तर कुठेतरी दादांच्या वेगळेपणाची आणि आपलेपणाची प्रचिती आल्यामुळे हे सर्व आपोआप घडते आहे. दादा नक्कीच सत्ताप्रेमी होते यामध्ये दुमतच नाही. कारण, त्यामुळे अनेकांची कामे करता येतात असे ते मोकळेपणाने बोलून दाखवत असत. दादांच्या अशा वेगळेपणाचे अनेक किस्से काठेवाडी, बारामती, पुणे, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र आणि मंत्रालयात अनेकांना माहित आहेत. असे म्हणतात की, 'राखावी बहुतांची अंतरे, भाग्य येते तद्नंतरे' हेच त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य होते. दादांचे आजचे धक्कादायक निधन त्यांच्या परिवाराप्रमाणेच महाराष्ट्रातील अनेक परिवारांना वेदना देणारे वाटते ही वस्तुस्थिती आहे. कारण दादा म्हणजे वाहते पाणी होते. त्या शुद्ध पाण्याप्रमाणेच ते पाणीदारही होते आणि बाणेदारही होते. ते मेणाहून मऊ आणि सुतासारखे सरळही होते, अशा या कडक शिस्तीच्या आवरणाखाली लपलेल्या प्रेमळ माणसाला आमची श्रद्धांजली!

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन
## संपूर्ण महाराष्ट्रात शोक : आज बारामतीत अंत्यसंस्कार



अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरूवार २९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. याप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे गुरूवारी बारामतीत येणार आहेत. त्यांच्यासह राज्य आणि देशभरातील अनेक मंत्री तसेच उद्योग आणि अन्य क्षेत्रातून मान्यवर उपस्थित राहतील.

अजित पवार पंचायत निवडणुकीसाठी जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी बारामतीला जात होते. महाराष्ट्र हवाई वाहतूक विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विमान लँडिंगसाठी बारामती विमानतळाजवळ येत होते. सुरुवातीला पायलटला धावपट्टी स्पष्ट दिसत नव्हती, म्हणून त्याने विमान जास्त उंचीवर नेले. रिपोर्टनुसार, त्यावेळी दृश्यमानता सुमारे २ हजार मीटर होती.

विमान लँडिंगचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, बारामतीच्या धावपट्टी ११ वर उतरण्याचा दुसरा प्रयत्न करण्यात आला. या दरम्यान, विमान धावपट्टीवरून घसरले आणि क्रॅश झाले. त्यानंतर लगेचच त्यात आग लागली.

लँडिंग दरम्यान पायलटने कोणतेही आपत्कालीन सिग्नल दिले नाहीत असेही वृत्त आहे. त्याने मेडे कॉल देखील केला नाही. घटनेच्या वेळी बारामती फ्लाइंग क्लबमध्ये कोणतेही विमान उडत नव्हते.

दरम्यान, या विमान अपघाताची कसून चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

### पायलटला धावपट्टी दिसली नाही

अजित पवारांचा ज्या विमान कंपनीच्या अपघाता मृत्यू झाला, त्या व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीने एक निवेदन जारी केले ज्यामध्ये म्हटले आहे की, पायलटला धावपट्टी दिसली नाही. त्याला सुमारे १६,००० तास विमान उड्डाणाचा अनुभव होता. सह-वैमानिकाला सुमारे १५०० तास विमान उड्डाणाचा अनुभव होता. विमानात कोणताही तांत्रिक बिघाड नव्हता. एअरलाइनकडे अजूनही सात विमाने आहेत. आम्ही ती ग्राउंड करत नाही आहोत. डीजीसीए आमच्या विमानांची तपासणी करत आहे.

घटनेचे गांभीर्य ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले मुंबईतील सर्व महत्त्वाचे कार्यक्रम आणि बैठका रद्द केल्या आहेत. मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोघेही विशेष विमानाने बारामतीला पोहचले. आपल्या सहकाऱ्याला अखेरचा निरोप देण्यासाठी संपूर्ण राज्य मंत्रिमंडळ बारामतीत उपस्थित राहण्याची शक्यता असून, तिथे अंत्यविधीची तयारी सुरू करण्यात आली आहे.

## तीन दिवसांचा दुखवटा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक दिग्गज व्यक्तिमत्व आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे राज्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, महाराष्ट्र शासनाने त्यांच्या सन्मानार्थ राज्यात तीन दिवसांचा राजकीय दुखवटा जाहीर केला आहे.

सामान्य प्रशासन विभागाने (राजशिष्टाचार) जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, प्रशासनाला अंमलबजावणीचे आदेश देण्यात आले आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्र्यांच्या निधनामुळे आजपासून तीन दिवस म्हणजेच ३० जानेवारी २०२६ पर्यंत संपूर्ण राज्यात शासकीय दुखवटा पाळला जाईल. या काळात राज्यातील ज्या सर्व इमारतींवर नियमितपणे राष्ट्रध्वज फडकवला जातो, तेथे राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकवण्यात येईल.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे त्यांना आदरांजली वाहण्यासाठी राज्य शासनाने आज, बुधवार २८ जानेवारी २०२६ रोजी, राज्यातील सर्व शासकीय कार्यालये बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. दुखवट्याच्या या तीन दिवसांच्या कालावधीत राज्य सरकारकडून कोणताही अधिकृत मनोरंजनाचा किंवा आनंदाचा कार्यक्रम आयोजित केला जाणार नाही. मंत्रालयाचे अवर सचिव एच.पी. बाविस्कर यांनी यासंदर्भातील आदेश राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक आणि विभागीय आयुक्तांना 'तात्काळ' या श्रेणीखाली पाठवले आहेत.

## हा निव्वळ अपघात.. यात राजकारण नाही

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :



अजित पवारांच्या विमान अपघातावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

अजित पवार यांचा हा अपघाती मृत्यू आहे. त्याचा महाराष्ट्राला प्रचंड असा धक्का आहे. एक कर्तृत्ववान, निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे, अशा व्यक्तीला महाराष्ट्र मुकला आहे. जे काही नुकसान झाले ते भरून निघणारे नाही. पण सगळ्याच गोष्टी आपल्या हातात नसतात. हा अपघात आहे. यामागे काही राजकारण आहे, अशा प्रकारची भूमिका मांडली गेली. मात्र, याच्यात राजकारण नाही. हा निव्वळ अपघात आहे. त्याच्या यातना महाराष्ट्राला, आम्हा सगळ्यांना आहेत. कृपा करून इथे राजकारण आणू नये, असे पवारांनी म्हटले आहे.

## वायुसेनेने हाती घेतले बारामतीचे एअर ट्रॅफिक कंट्रोल

■ वृत्तसंस्था, पुणे,दि. २८ :

महाराष्ट्र सरकारच्या तातडीच्या विनंतीवरून, भारतीय हवाई दलाने लोहेगाव हवाई दल स्थानकातून आवश्यक तांत्रिक उपकरणांसह हवाई वाहतूक नियंत्रण कर्मचाऱ्यांचे एक पथक तातडीने बारामती विमानतळावर पाठवले. या पथकाने स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने सुरक्षित आणि कार्यक्षम हवाई वाहतूक व्यवस्थापनाला पाठिंबा देण्यासाठी, दळणवळण आणि इतर आपत्कालीन सुविधांसह आपत्कालीन हवाई वाहतूक नियंत्रण सेवा त्वरित सुरू केली.



## मुख्यमंत्री अजितदादा, अलविदा...!

● संदीप काळे

अनेकांना अजितदादा यांच्यासाठी वापरलेला 'मुख्यमंत्री' हा शब्द कदाचित तांत्रिकदृष्ट्या नक्कीच खटकेल, पण हा वास्तवाचा आरसा काही वेगळाच होता. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना कोरोनाच्या त्या भीषण काळात प्रशासनाची सर्व सूत्रे अजितदादांच्या हातात होती.



मंत्रालयातील अनेक बैठकांना पत्रकार म्हणून उपस्थित राहण्याचा योग आला, तेव्हा जाणवायचे की, अजितदादाच मुख्यमंत्री म्हणून सर्व जबाबदारी समर्थपणे पेलत आहेत.

सहा वेळा उपमुख्यमंत्री राहिलेला हा माणूस या राज्याचा 'लोकनियुक्त मुख्यमंत्री' व्हावा, अशी इच्छा महाराष्ट्रातील प्रत्येक कार्यकर्ते, समाजाच्या मनात होती. पण सत्तेच्या पदापलीकडे जाऊन गेल्या तीन टर्ममध्ये दादांची कार्यपद्धती एखाद्या मुख्यमंत्र्याला साजेशीच होती. त्यांना केवळ मुख्यमंत्री असे पद मिळाले नाही काय ते एवढेच.

दादा नाही,आज हे सर्व लिहिताना लेखणी जणू थबकते आहे. केवळ मुख्यमंत्री पद नव्हे, तर देशाच्या राजकारणात सक्षम नेतृत्व करण्याची धमक असणारा हा 'दादा माणूस' आज महाराष्ट्राला पोरका करून गेला. त्यांच्याशी जोडलेल्या ऐतिहासिक स्मृती आणि आठवणींचा महासागर समोर उभा आहे. तो थट्टा-मस्करी करणारा, स्पष्ट बोलणारा आणि प्रत्येकाचे प्रश्न तडीला नेणारा 'अजितदादा' नावाचा माणूस आता पुन्हा होणे नाही, हेच दाहक सत्य आहे.

मला आजही आठवते, मी आणि पत्रकार चेतन बंडेवार बारामतीला होणाऱ्या 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या पत्रकार अधिवेशनासंदर्भात दादांना भेटायला गेलो होतो. पहिल्याच भेटीत दादांनी स्पष्ट सांगितले,"नियोजन समोर ठेवा आणि मगच चर्चेला बसा. दुसऱ्या भेटीत आम्ही बारामतीला गेलो. नियोजनाचा आराखडा मांडला. बैठकीच्या सुरुवातीलाच त्यांनी त्यांचे खाजगी सचिव हनुमंत पाटलांना विचारले, मुंबईहून आलेल्या पाहुण्यांच्या जेवणाचं काय? त्यांच्या आदरातिथ्याचा तो ओलावा आजही आठवतो.

जेवण झाल्यावर पुन्हा बैठक सुरू झाली. प्रत्येक विषयातील त्यांचा बारकावा, हवा असलेला संदर्भ आणि बारामतीला येणारी पत्रकार मंडळी इथलं वैभव पाहून गेली पाहिजेत, हा त्यांचा आग्रहीपणा थक्क करणारा होता.

कार्यक्रमाच्या अगोदर आम्ही जेव्हा त्यांना मलबार हिलच्या बंगल्यावर भेटायला गेलो, तेव्हा माझ्या आणि चेतन यांच्या हातातील पुष्पगुच्छ पाहून दादा आपल्या खास शैलीत म्हणाले होते, हा पुष्पगुच्छ लाखांमध्ये राहू द्या, कोटींमध्ये जाऊ देऊ नका! त्यांच्या या मिश्किल टिप्पणीने वातावरणात एकच हशा पिकला. छोट्या गोष्टीला विनोदाची झालर लावत प्रत्येकाला न्याय मिळेल याची खबरदारी घेणे आणि जे शक्य नाही त्याला 'नाही' म्हणण्याचे नैतिक धाडस दाखवणे, ही 'दादा स्टाईल' फक्त त्यांच्याकडेच होती.

बारामतीच्या अधिवेशनानंतर चार दिवसांनी दादा आणि सुनेत्रा पवार यांनी आम्हाला मलबार हिलच्या बंगल्यावर घरी जेवायला बोलावले. जेवण झाल्यावर दादांनी एक कागद माझ्या हातात देत ते म्हणाले, हे पाहा बारामतीच्या अधिवेशनावर ▶▶ पान ८ वर



अपघातानंतर विमानाचे इंजिन दुसरीकडे पडल्याचे आढळून आले.

## पायलटचे शेवटचे शब्द होते... ओह शिट...ओह शिट

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :

महाराष्ट्रातील बारामती येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांच्यासोबत विमानात असलेले पर्सनल सिक्युरिटी ऑफिसर एचसी विदिप जाधव, पायलट कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन शांभवी पाठक आणि फ्लाइट अटेंडंट पिंकी माळी यांचाही मृत्यू झाला आहे.

विमान कोसळण्यापूर्वी कॅप्टन शांभवी पाठक यांचे शेवटचे शब्द होते - ओह शिट...ओह शिट. माहितीनुसार, विमानाची धुरा कॅप्टन सुमित कपूर आणि शांभवी पाठक यांच्या हातात होती.

वैमानिकांनी रनवेवर उतरण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना रनवे दिसला नाही. वैमानिकांनी विमान पुन्हा वर घेतले. थोड्या वेळाने पुन्हा उतरण्याचा प्रयत्न केला. यावेळी विमान रनवेच्या दिशेने सरकले, पण रनवेला स्पर्श करण्यापूर्वीच ते उलटले आणि जमिनीवर आदळले.

बारामती विमानतळाजवळ गावाचा परिसर आहे. येथे अनेक लोकांनी अपघातापूर्वी विमान पाहिले होते. एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले, विमान धावपट्टीजवळ पोहोचण्यापूर्वी सुमारे १०० फूट आधीच कोसळले. जेव्हा विमान खाली उतरत होते, तेव्हाच अपघात होईल असे वाटत होते आणि तसेच झाले.

प्रत्यक्षदर्शीनुसार, धावपट्टीवर आदळल्यानंतर विमानात स्फोट झाला आणि भीषण आग लागली. त्यानंतर आणखी ४-५ स्फोट झाले. यानंतर स्थानिक लोक घटनास्थळाकडे धावले. लोकांनी विमानात असलेल्या लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, परंतु आग इतकी भयानक होती की ते मदत करू शकले नाहीत.

एका गावकऱ्याने सांगितले, विमान आधी गावावरून गेले. नंतर गावाच्या खाली येताना दिसले. त्यानंतर धावपट्टीवर जाऊन उलटले आणि जमिनीवर आदळले. स्फोटानंतर विमानाचे तुकडे उडून आमच्या घरापर्यंत येऊन पडले.

खाजगी चार्टर्ड विमान व्हीएसआर कंपनीचे होते, या अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मुंबई पीएसओ विदीप जाधव, पायलट कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन संभवी पाठक आणि फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांचाही मृत्यू झाला.

# : अजितदादा पवार :
# राजकीय प्रवास आणि वैशिष्ट्ये

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :

राज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांचे आज एका विमान दुर्घटनेत निधन झाले. दादांच्या अचानक जाण्याचे अख्खा महाराष्ट्र हादरला आहे. तब्बल सहा वेळा राज्याचे उपमुख्यमंत्रीपद भुषवणारे अजित पवार यांचा राजकीय प्रवास आणि त्यांच्या वैशिष्ट्यांवर टाकलेला हा प्रकाशझोत.



१. जन्म आणि कुटुंबः २२ जुलै १९५९ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील देओली येथे जन्म.

२. शिक्षणः त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या मूळ गावी आणि माध्यमिक शिक्षण मुंबईत झाले. त्यांनी बी.कॉम. (B.Com) पर्यंत शिक्षण घेतले आहे.

३. राजकीय सुरुवातः १९८२ मध्ये एका सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदापासून त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला.

४. सहकारी संस्थांवर पकडः पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (PDCC) मध्ये त्यांनी दीर्घकाळ अध्यक्ष म्हणून काम पाहिले आणि बँकेला मोठी उंची मिळवून दिली.

५. संसदीय कारकीर्द : १९९१ मध्ये ते पहिल्यांदा बारामती लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून गेले होते.

६. त्याग आणि निष्ठा : शरद पवार पी.व्ही. नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात संरक्षण मंत्री झाले तेव्हा अजितदादांनी त्यांच्यासाठी खासदारकीचा राजीनामा दिला.

७. आमदारकीचा विक्रमः १९९१ पासून २०२४ पर्यंत ते सलग ८ वेळा बारामती विधानसभा मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने निवडून आले.

८. राज्यमंत्री पदः १९९१ मध्ये सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी पहिल्यांदा कृषी आणि ऊर्जा राज्यमंत्री म्हणून काम पाहिले.

९. जलसंपदा क्षेत्रातील कामः जलसंपदा मंत्री म्हणून काम करताना त्यांनी राज्यात सिंचनाचे जाळे पसरवण्यासाठी अनेक मोठे प्रकल्प हाती घेतले.

१०. वक्तशीरपणाः अजितदादा त्यांच्या शिस्तीसाठी प्रसिद्ध होते. पहाटे ६-७ वाजता कामाला सुरुवात करणे आणि मंत्रालयात वेळेवर पोहोचणे ही त्यांची ओळख होती.

११. उपमुख्यमंत्री पदाचा विक्रमः महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक वेळा (६ वेळा) उपमुख्यमंत्री होण्याचा बहुमान त्यांना मिळाला.

१२. प्रशासकीय पकडः अधिकारशाहीवर त्यांची जबरदस्त पकड होती, ज्यामुळे दादांनी शब्द दिला की काम होणारच अशी त्यांची जनमानसात प्रतिमा होती.

१३. अर्थमंत्री म्हणून भूमिकाः अनेक वर्ष राज्याचे अर्थमंत्री म्हणून काम करताना त्यांनी महाराष्ट्राचा अर्थसंकल्प प्रभावीपणे मांडला.

१४. २०१९ चा पहाटेचा शपथविधीः २३ नोव्हेंबर २०१९ रोजी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती, जो भारतीय राजकारणातील सर्वात चर्चेचा विषय ठरला.

१५. महाविकास आघाडीः त्यानंतर लगेचच स्वगृही परतून त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.

१६. विरोधी पक्षनेतेः २०२२ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर त्यांनी विधानसभा विरोधी पक्षनेते म्हणून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले.

१७. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूटः २ जुलै २०२३ रोजी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मोठ्या गटासह शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सामील होण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

१८. पक्षाध्यक्ष आणि चिन्हः कायदेशीर लढाईनंतर निवडणूक आयोगाने त्यांचा गट हीच 'मूळ राष्ट्रवादी काँग्रेस' असल्याचे मान्य करून त्यांना 'घड्याळ' चिन्ह दिले.

१९. विकासकामांचा ध्यासः बारामतीचा कायापालट करून तिथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे श्रेय त्यांना दिले जाते.

२०. कार्यसम्राट नेताः स्पष्टवक्तेपणा आणि कडक स्वभाव असूनही, कार्यकर्त्यांच्या मदतीला धावून जाणारा नेता म्हणून त्यांची सर्वपक्षीय ओळख होती.

# घड्याळानेच दिली दादांना शेवटची ओळख

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि धडाडीचे नेते म्हणून ओळख असणारे अजित पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. बुधवारी सकाळी बारामतीत झालेल्या या भीषण दुर्घटनेत अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

या दुर्घटनेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विदीप जाधव, पिंकी माळी, कॅप्टन सुमित कपूर आणि कॅप्टन शांभवी पाठक यांचा मृत्यू झाला. सर्व मृतदेह अत्यंत जळालेल्या अवस्थेत आढळून आले. अजित पवार यांच्या मृतदेहाची ओळख त्यांच्या मनगटावरील घड्याळामुळे पटली. राजकीय जीवनात घड्याळ हेच चिन्ह घेऊन अजित पवारांचा संपूर्ण प्रवास झाला आणि त्याच घड्याळाने त्यांच्या आयुष्याची शेवटची ओळख पटवणे, हा नियतीचा अत्यंत क्रूर खेळ असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.

या अपघाताने संपूर्ण राज्य हादरून गेलं असून राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात तीव्र शोककळा पसरली आहे. अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्राने एक अनुभवी, आक्रमक आणि प्रभावी नेता गमावल्याची भावना व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुधवारी बारामतीत अजित पवार यांच्या चार प्रचार सभा नियोजित होत्या. या सभांसाठी ते नेहमीप्रमाणे सकाळी लवकर घराबाहेर पडले.

सर्व कामे उरकून सकाळी ठीक ८ वाजून १० मिनिटांनी अजित पवार मुंबईहून खासगी विमानाने बारामतीकडे रवाना झाले. नियोजनानुसार लँडिंगनंतर थेट प्रचार दौऱ्याला सुरुवात होणार होती. मात्र, नियतीने वेगळाच घाव घातला आणि हा दौरा कधीही न भरून येणाऱ्या शोकांतिकेत बदलला.

सकाळी ८ वाजून ४६ मिनिटांच्या सुमारास बारामतीत लँडिंग करत असताना अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला.

लँडिंगच्या ऐन क्षणी विमानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे वैमानिकाचे नियंत्रण सुटले आणि विमान धावपट्टीवर उतरण्याऐवजी एअरपोर्टपासून दोन ते तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या गोजुबावी परिसरातील शेतात कोसळले. अपघात इतका जबरदस्त होता की विमानाचे तुकडे झाले आणि काही क्षणांतच विमानाला भीषण आग लागली.

अपघात ज्या ठिकाणी झाला तो भाग खोलगट असून आजूबाजूला झाडझुडपं, उसाची शेती आणि काही घरांची वस्ती आहे. विमान थेट उतारावरील जमिनीवर आदळल्यामुळे त्याला प्रचंड धक्का बसला.

संपूर्ण विमान जळून कोळसा झाले. मात्र या भीषणतेतही आश्चर्याची बाब म्हणजे विमानातील काही कागदपत्रे सहिसलामत आढळून आली. अंदाज व्यक्त केला जात आहे की, विमान कोसळल्यानंतर दोन तुकड्यांमध्ये विभागले गेले असावेत आणि त्यामुळे कागदपत्रे बाहेर फेकली गेली असावीत.

या अपघाताचा घटनाक्रम पाहता, सकाळी ८.१० वाजता लियरजेट ४५ एक्सआर प्रकारचे विमान मुंबईहून बारामतीकडे रवाना झाले होते. सकाळी ८.४० च्या सुमारास विमान बारामती एअरस्ट्रीपच्या अगदी जवळ आले असताना त्यात तांत्रिक बिघाड झाल्याचे निदर्शनास आले.

त्यानंतर अवघ्या सहा मिनिटांत, म्हणजेच सकाळी ८.४६ वाजता, वैमानिकाचे नियंत्रण सुटले आणि विमान थेट शेतात कोसळले. या अपघातात विमानातील एकाही व्यक्तीचा जीव वाचू शकला नाही.

या अपघातानंतर अवघा महाराष्ट्र सुन्न झाला आहे. बारामतीपासून मुंबईपर्यंत, गावोगाव शोक व्यक्त केला जात आहे. निवडणूक प्रचारासाठी निघालेले अजित पवार परत येणार नाहीत, ही कल्पनाच कार्यकर्त्यांना आणि जनतेला पचवणं कठीण होत आहे.

धडाडीचा, कडक शिस्तीचा आणि निर्णयक्षम नेता अचानक काळाच्या पडद्याआड गेला आणि महाराष्ट्राच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



# हे खूप खूप चुकीचे घडले... दमानिया

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :

राज्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संदर्भात समोर आलेल्या अपघाताच्या वृत्तांनी राजकीय आणि सामाजिक वतुर्ळात मोठी अस्वस्थता निर्माण केली आहे. या घडामोडींनंतर अनेक नेते, कार्यकर्ते आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

विशेष म्हणजे अजित पवार यांच्याविरोधात सातत्याने संघर्ष करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी दिलेली भावनिक प्रतिक्रिया सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. राजकीय मतभेद असले तरी मानवी नातेसंबंध आणि संवेदना यापलीकडे काहीच नसते, हेच त्यांच्या प्रतिक्रियेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

अंजली दमानिया यांनी प्रतिक्रिया देताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, डोकं सुन्न झालं आहे. विश्वासच बसत नाही. त्यांनी पुढे सांगितले की अजित पवार यांच्या विरोधात त्यांनी वैचारिक आणि सार्वजनिक पातळीवर जीवापाड संघर्ष केला आहे आणि तो संघर्ष आयुष्यभर सुरू ठेवण्याची त्यांची तयारी होती. मात्र, अपघाताच्या या बातम्यांनी जबर धक्का दिला असून, राजकारण बाजूला पडून माणूस म्हणून मन हादरल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मी विरोध केला, प्रश्न विचारले, आंदोलन केली; पण हे घडणं खूप चुकीचं आहे, असे म्हणत दमानिया यांनी कोणताही राजकीय अभिनिवेश न ठेवता आपली भूमिका मांडली. त्यांच्या मते, लोकशाहीत विरोध हा आवश्यकच असतो, पण अचानक समोर येणाऱ्या अशा घटनांनी सर्वच समीकरणे बदलून जातात. त्यांनी व्यक्त केलेला धक्का इतका तीव्र होता की, हे स्वीकारणंच शक्य होत नाही.

अपघाताच्या वृत्तांमुळे राज्यातील राजकीय वातावरण स्तब्ध झाले आहे. अजित पवार हे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक प्रचारासाठी बारामतीमध्ये सभा घेणार होते. या दौऱ्याशी संबंधित घडामोडींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. मी त्यांच्याशी सहमत नव्हते, पण माणूस म्हणून मनाला मोठा धक्का बसला आहे, या घटनेने मला व्यक्तीशः खूप दुःख झाले आहे, असे सांगत त्यांनी राजकीय विरोध आणि वैयक्तिक संवेदना यामधील फरक अधोरेखित केला.

# वडील नसल्याची उणीव भासू दिली नाही

■ वृत्तसंस्था, बीड, दि. २८ :



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याचे समजताच माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांना अश्रू अनावर झाले. धनंजय मुंडे गाडीत बसून कॉलवर बोलताना त्यांना शब्द फुटत नसल्याचे पाहायला मिळाले. माझ्या सारख्याल वडील नाहीत याची कधी जाणीव नाही होऊ दिली, अशा भावना त्यांनी बोलून दाखवल्या.

पुढे त्यांना बोलताही आले नाही, इतके त्यांना अक्षरशः रडू कोसळल्याचे पाहायला मिळाले. धनंजय मुंडे यांच्यासह सर्वज राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्यांना अश्रू अनावर झाले आहेत.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार प्रतापराव चिखलीकर यांना देखील अश्रू अनावर झाले होते. तसेच राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते हसन मुश्रीफ यांनी अजित दादा म्हणत अश्रूंना वाट मोकळी केली. बारामती येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या बाहेर कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली असून एकच आक्रोश पाहायला मिळत आहे. अजित दादांची एक झलक पाहण्यासाठी कार्यकर्ते जमण्यास सुरू झाले आहेत.

**'आमचे दादा आम्हाला परत द्या'**

आजूबाजूच्या गावातील हजारो नागरीक व कार्यकर्ते बारामती शहराच्या दिशेने येत आहेत. वैद्यकीय महाविद्यालयाच्या बाहेर कार्यकर्त्यांचा मोठा ताफा जमा झाले असून, आमचे दादा आम्हाला परत द्या, अशा आर्त हाका मारताना धाय मोकलून रडताना दिसत आहेत. पोलिसांनी शहरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे.

# अजितदादांची अकाली एक्झिट!

सकाळी सव्वा नऊ वाजता शिवसेनेचे माजी आमदार शिशिर शिंदे यांचा मला फोन आला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सहा जणांचा सकाळी पावणे नऊच्या सुमारास बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाल्याचे त्यांनी मला सांगितले. मला धक्का बसलाच पण या घटनेने सारा महाराष्ट्र हळहळला.

आदल्या दिवशी मुंबईत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला अजितदादा उपस्थित होते. बुधवारी सकाळी ते एका छोट्या खाजगी विमानाने बारामतीला निघाले, जिल्हा परिषद निवडणुकीसाठी बारामतीत त्यांच्या तीन प्रचारसभा होत्या. बारामती विमानतळावर विमान उतरत असताना धावपट्टीवरून घसरले नि मोठा स्फोट होऊन विमानाने पेट घेतला. वृत्तवाहिन्यांवर अजिदादांचा विमान अपघातात मृत्यु अशा बातम्या सुरू झाल्या आणि सारा महाराष्ट्र सुन्न झाला.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख, आर. आर. पाटील यांच्या निधनानंतर असाच महाराष्ट्र अस्वस्थ झाला होता. अजित पवार हा लढवय्या नेता होता. त्यांचे काका शरद पवार यांचे बोट धरून ते सार्वजनिक जीवनात आले. पण त्यांनी आपल्या कामाने महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

त्यांनी शरद पवारांच्या विरोधात जुलै २०२३ मधे बंडाचा झेंडा फडकवला, पक्षाचे चाळीस आमदार घेऊन ते भाजपप्रणित महायुतीच्या छावणीत दाखल झाले. एकनाथ शिंदे यांच्या सरकारमधे उपमुख्यमंत्री झाले. राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्षाचे नाव व घड्याळ हे चिन्ह त्यांनी आपल्या पक्षाकडे घेण्यात यश मिळवले.

शरद पवारांनी १९९९ मधे स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस या नावाचे दोन पक्ष झाले. काकांच्या पक्षाला तुतारी चिन्ह मिळाले. दोन पक्ष वेगळे, दोन चिन्ह वेगळी. पण पवार परिवारात कौटुंबिक संबंध सलोख्याचे राहिले. दरवर्षी दिवाळीत पवार परिवार बारामतीत एकत्र असतो. कौटुंबिक कार्यक्रमाला सारे पवार कुटुंबिय एकत्र दिसले. राजकारण वेगळे असले तरी कौटुंबिक नाते संबंध काका पुतण्यांनी टिकवून ठेवलेत.

अजित पवार हा महाराष्ट्राच्या राजकारणातील लंबे रेस का घोडा होता, पण नियतीने त्यांच्यावर अचानक घाला घातला. अजितदादा म्हणजे शब्दाला पक्का, कामाला वाघ होता. त्यांच्या मृत्युने राजकारणातील



एक झंजावात संपला. प्रशासनावर त्यांची जबरदस्त पकड होती.

दुसरीकडे सर्वसामान्य जनतेचे व कार्यकर्त्यांचे ते खऱ्या अर्थाने दादा होते. कार्यकर्त्यांसाठी वाट्टेल ते...असा त्यांचा खाक्या होता. मात्र चुकीचे काम कोणी आणले तर ते होणार नाही, असे रोख ठोकपणे सांगणारा त्यांचा स्वभाव होता.

**डॉ. सुकृत खांडेकर**
**मुंबई.**

लोकाभिमुख नेता कसा असावा याचे उदाहरण म्हणजे अजितदादा होते. दिलेला शब्द पाळणारा नेता होता. बारामती ते मंत्रालय असा त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला होता. म्हणूनच त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेताना, दादा परत या असा आक्रोश सामान्य जनतेकडून प्रकट झाला.

सन २००४ मधे झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ७१ तर काँग्रेसचे ६९ आमदार निवडून आले होते. आपल्या पक्षाचे जास्त आमदार निवडून आले, म्हणून मुख्यमंत्रीपद राष्ट्रवादीला म्हणजेच आपल्याला मिळेल असे अजितदादांना वाटले होते. पण शरद पवारांनी मुख्यमंत्रीपद काँग्रेसला दिले व आपली संधी गेली, अशी भावना अजितदादांनी अनेकदा बोलून दाखवली होती.

सुप्रिया यांचा २००९ मधे राजकारणात प्रवेश झाला तेव्हाच अजितदादांना आता आपल्याला डावलले जाईल असे वाटू लागले होते. १९९९ ते २००९ या काळात ते सरकारमधे जलसंधारण मंत्री होते. त्याच काळात सत्तर हजार कोटींचा सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले.

२०१४ च्या निवडणुकीत भाजपाने अजितदादांवर भ्रष्टाचारी म्हणून आरोप केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी चक्की पिसिंग .. पिसिंग असा फिल्मी डायलॉग मारला होता. तेव्हा आपली बदनामी करण्याचे षडयंत्र रचले गेले आहे, असे अजितदादांनी म्हटले होते. सहकार क्षेत्रातील साखर कारखाने कवडीमोल भावाने विकल्याच्या त्यांच्यावर आरोप झाला होता, ऑगस्ट २०२२ मधे मुंबई उच्च न्यायालयाने चौकशीचे आदेश दिले होते. नंतर ती फाईलच क्लोज झाली.

२ मे , २०२२ रोजी शरद पवारांनी पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तेव्हा, अजितदादांनी, नवीन चेहऱ्यांना सधी दिली जाईल असे म्हटले होते, पण चार दिवसातच शरद पवारांनी राजीनामा मागे घेतला. त्यानंतर अजितदादांनी बंडाचा झेंडा फडकविण्याचा निर्णय घेतला व एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील सरकारमधे सामील झाले. अजित पवारांनी शरद पवारांचा गळा घोटला , अशी टीका पवारांच्या निकटवर्तीयांनी त्यांच्यावर केली होती.

सहा वेळा उपमुख्यमंत्री व रेकॉर्डब्रेक अर्थमंत्री अशी अजित पवारांच्या नावापुढे नोंद राहिल. सुशीलकुमार शिंदे, विलासराव देशमुख, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस, उध्दव ठाकरे, एकनाथ शिंदे अशा मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीत ते सरकारमधे विविध खात्याचे मंत्री राहिले. मुख्यमंत्री बदलत राहिले पण अजितदादा उपमुख्यमंत्री नि अर्थमंत्री म्हणून कायम राहिले. मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न मात्र त्यांचे पूर्ण होऊ शकले नाही.

अजितदादांचे नाव घेतले की त्यांनी देवेंद्र फडणवीसांबरोबर राजभवन (आता लोकभवन) वर पहाटेचा घेतलेला शपथविधी सर्वांना आठवतो. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी फडणवीस यांना मुख्यमंत्री व अजित पवारांना उपमुख्यमंत्री म्हणून शपथ दिली होती.

विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर दि. २२ नोव्हेंबर २०१९ रोजी नेहरू सेंटरला काँग्रेस, अविभाजित शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक चालू होती. या बैठकीला अजितदादा हातात एक फाईल घेऊन बसले होते. मधेच एक फोन आला म्हणून ते बाहेर गेले. दुसरा दिवस उजाडला तो देवेंद्र व अजितदादांच्या शपथविधीच्या वृत्ताने सारा महाराष्ट्रात हादरला.

हे सरकार पाच वर्षे चालेल असे योजले होते. तेव्हा अजितदादा म्हणाले- तीन पक्षांच्या (काँग्रेस, शिवसेना व रार्ष्ट्रवादी काँग्रेस) चर्चेला काही अंत नाही. एक महिन्यापासून चर्चा चालूच आहे, जी कुठे पोचणार नाही. राज्याला स्थिर सरकार हवे आहे म्हणून मी हे पाऊल उचलले.

२०१९ मधे अजितदादा भाजपा सोबत सरकार स्थापनेसाठी गेले, तेव्हा त्यांच्यावर घर फोडणारे म्हणून टीका झाली. त्यावर अजितदादांनी , आम्ही भाजपासोबत जाणार हे शरद पवारांना ठाऊक होते असे म्हटले... पण शरद पवरारांच्या दबावामुळे अजितदादांबरोबर गेलेले बंडखोर आमदार परतले व पहाटे स्थापन झालेले सरकार ऐंशी तासात कोसळले.

सन २०२४ मधे झालेल्या लोकसभा निवडणुकीत बारामतीत सुप्रिया सुळेंच्या विरोधात अजित पवारांनी त्यांची पत्नी सुनेत्रा पवारांना उभे केले. सुप्रिया निवडून आल्या. भाजपाच्या सांगण्यावरून अजित पवारांनी सुनेत्रा पवारांना सुप्रिया विरोधात उभे केले अशी तेव्हा चर्चा झाली. नंतर अजित पवार यांनी म्हटले, बहिणीच्या विरोधात पत्नीला उभे करणे ही एक चूक होती.

अजित पवार हे भाजपाबरोबर महायुती सरकारमधे सामील झाले तरी त्यांनी शरद पवारांशी संबंध तोडले नाहीत. अनेक सहकारी व शिक्षण संस्थांमधे काका-पुतण्या पदाधिकारी आहेत त्या निमित्ताने त्यांच्या नियमित भेटी गाठी होतच राहिल्या.

भाजपासोबत जाऊनही ते भाजपाच्या आहारी गेले नाहीत. कधी जाती धर्माचे राजकारण केले नाही. कधी हिंदू- मुस्लिम मुद्दा उगाळला नाही. नागपूर येथे विधिमंडळाच्या अधिवेशन काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात जाऊन आपण संघ व भाजपाचे किती जवळचे आहोत असे प्रदर्शन केले नाही. सरकारमधे काही मनाविरूध्द घडले म्हणून वारंवार दिल्लीला धाव घेऊन मोदी- शहांकडे तक्रारी केल्या नाहीत.

पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रावर पवार काका- पुतण्याचे विशेष प्रेम आहे. भाजपाची मक्तेदारी तोडल्याशिवाय आपले पुण्यावर वर्चस्व निर्माण होणार नाही याची अजितदादांना खात्री होती. पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने मिळून भाजपाच्या विरोधात लढवली.

जिल्हा परिषद निवडणूकही दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रपणे घड्याळ चिन्हावर लढवत आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची विचारसरणी एकच आहे. निवडणूक काळात जेव्हा अजितदादांवरआरोप झाले तेव्हा ते म्हणाले.... तुमच्या बापापेक्षा माझा काका मोठा आहे.

■ ■ ■

# विश्वासच बसत नाही, दादा...

राजकारणाच्या रंगमंचावर अनभिषिक्त दादागिरी करणाऱ्या अजित दादांची अकाली एक्झिट झाली. रंगभूमीच्या गत वैभवात जी लोकप्रियता स्व. अभिनेते डॉ. काशिनाथ घाणेकर यांना मिळाली होती, त्याच्या अनेक पटीने जास्त अजितदादा लोकप्रिय नेते होते. हो आता होतेच म्हणावे लागेल.



**गजानन तुपे**
**निवासी संपादक**
**दैनिक महासागर, मुंबई.**

अजित दादा हे एक अजब रसायन होतं. राजकारणी मंडळींमध्ये आजूबाजूच्यांना आणि कामासाठी येणाऱ्यांना झुलवत ठेवण्याची प्रथा आहे. अजित दादांनी ही प्रथाच मोडीत काढली. कामानिमित्त येणारा कार्यकर्ता असो अथवा कोणी गरीब गरजू असो, काम होणार असेल तर येस म्हणून लगेच त्या कामाला दिशा द्यायची आणि जर ते होण्यासारखे नसेल. तर तिथल्या तिथे नकार द्यायचा, समोरच्याला झटक्यात मोकळं करणारा नेता अशी त्यांची ख्याती होती.

दिल्या शब्दाला जागणारा राजकारणी हे बिरूद त्यांना त्यामुळेच सर्वांनी बहाल केले होते. दादांचा स्वभाव स्पष्ट वक्तेपणाचा असला तरी बऱ्याच जणांना ते फटकळही वाटत. त्यांच्या फटकळपणाला बोचऱ्या विनोदाची झालरही असायची. असं म्हणतात की नेते आणि अभिनेते यांच्यात फारसा फरक नसतो कारण दोघेही समोरच्या जनसमुदायाला मंत्रमुग्ध करतात. लोकांवर गारुड करतात, त्यांना रडवतात आणि हसवतातही. विनोदी नाटकात काम करणारे बरेचसे विनोदी नट प्रेक्षकांकडून जोरात हशा मिळायला लागला की लेखकाने लिहिलेल्या संहिते बाहेरची म्हणजे स्वतःच्या पदरची वाक्ये (नाटकात त्याला ॲडिशन म्हणतात) पेरून प्रेक्षकांना आणखी हसवून त्यांचे मनोरंजन करतात.

दादांनाही समोरच्या लोकांची नस पकडण्याची कला चांगलीच अवगत होती. एखाद्या कसलेल्या विनोदी अभिनेत्या पेक्षा काकणभर सरस हजरजबाबी पणा आणि वाक्चतुरता दादांकडे होती. मात्र समोरच्या जनसमुदायाला आणखी हसवण्याच्या नादात दादांकडून बऱ्याचदा वादग्रस्त विधाने केली गेली. त्यामुळे स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या कराड येथील स्मृतीस्थळी प्रीतीसंगमावर जाऊन त्यांना अगदी आत्मक्लेषही करावा लागला.

बोलून झाल्यावर बरेच राजकारणी सारवासारव तरी करतात किंवा विधानाचा विपर्यास केल्याच्या किंवा झाल्याच्या अगरबत्त्या ओवाळत असतात. मात्र अजित दादांनी तसे कधीच केले नाही, उलट बोलण्याच्या ओघात बोलून गेलो. परंतु ते माझे विधान चुकीचे होते असे म्हणून मनापासून माफी मागण्याचा त्यांचा जसा प्रांजळपणा होता, तसा हल्ली अभावानेच आढळतो.

विरोधकांसोबत लढण्याचा दमदारपणा आणि निवडणुका संपल्या की विरोधकांचेही काम मार्गी लावण्याचा दिलदारपणा अजितदादांच्या ठायी होता. मा. ना. शरदचंद्रजी पवार साहेबांच्या तालमीत राजकारणाचे बाळकडू मिळाल्यानंतर त्यांच्यासारखाच लोकसंग्रह करणारे अजितदादा हे एकमेव नेते होते असे म्हणावे लागेल. त्यामुळेच एरवी पहाडासारखे अविचल आणि बेफिकीर वाटणारे त्यांचे विविध जिल्ह्यातील नेते आज आपला कणखरपणा विसरून लहान मुलांसारखे ढसाढसा रडताना दिसत आहेत. त्यांच्या चाहते आणि पक्ष कार्यकर्त्यांसोबतच विरोधकांच्याही डोळ्यात आलेले अश्रू आज उभ्या महाराष्ट्राने पाहिले.

सत्तेचा सारीपाट आपल्या चालीनुसार हवा तसा हलवण्याची धमक या नेत्यामध्ये होती. महाविकास आघाडीचे सहकार स्थापन होऊन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होण्याआधी झालेला पहाटेचा शपथविधी म्हणजे, अलीकडच्या राजकारणातील एक जबरदस्त रहस्यमय आणि अनाकलनीय घटना होती.

त्यानंतर लगेच उद्धव ठाकरेंच्या मंत्रिमंडळातही उपमुख्यमंत्री पदी त्यांना बसवले गेले. ही गोष्ट त्यांचे राजकीय वजन आणि ताकद काय असेल त्याची साक्ष देते. त्यानंतरच्या काळातील बदलत्या राजकारणातही दादांनी काही वादळी निर्णय घेतले आणि त्या निर्णयाशी ठाम राहून आपल्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पोरके होऊ दिले नाही.

ही गोष्ट अजितदादा लोकांना किती आपले वाटायचे हे सांगण्यासाठी पुरेशी आहे. आज-काल राजकारणात स्तुती पाठकांचे चांगले दिवस आहेत मात्र एका शब्दाचीही टीका अथवा विडंबन ऐकण्याची मानसिकता कोणाचीच राहिली नाही. महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यावर

*जीवाभावाच्या नात्याची... कमळाक्का विसरली जाण*
*हातावर घड्याळ बांधून... धनुष्यातून सुटला बाण!*

या आमच्या तत्कालीन राजकीय वात्रटिकेला दुसऱ्या दिवशी मोबाईलवर फोन करून त्यांनी दिलेली दाद वारे पठ्ठ्या भारीच की... अजूनही स्मरणात आहे. तर गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर 'देवा मला मुख्यमंत्री करशील का' हे विडंबन प्रकाशित झाल्यानंतर चार दिवसांनी एका पत्रकार मित्राच्या फोनवर वरून आता गाणीबी लिवाय लागलास का? अशी केलेली विचारणा कधीच विसरण्यासारखी नाही.

अजितदादा असेच होते सहा वेळा उपमुख्यमंत्री होऊन ते मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचू शकले नाहीत, ही खंत जेवढी त्यांना होती त्याहून जास्त खंत त्यांच्या चाहत्यांना होती. शेवटी परमेश्वरी इच्छेपुढे कोणाचेच काही चालत नाही हेच खरे आहे. दादांच्या विमान अपघाताची बातमी कानावर पडली तेव्हा काळ सुद्धा थोडासा थांबल्याचा भास झाला.

कारण दादा म्हणजे स्पष्टपणा दिलखुलासपणा आणि दिलदार पणाचे जगावेगळे मिश्रण होते. खरेतर विश्वासच बसत नाही की अजित दादा आपला आता आपल्यात नाहीत. संपूर्ण बारामती शोकसागरात बुडाली आहे, राज्यभरातून हळहळ व्यक्त होत आहे. एका आगळ्यावेगळ्या स्वभावाच्या, धाडसी आणि मनस्वी नेतृत्वाला भावपूर्ण श्रद्धांजली!

महासागर •गुरुवार,दि.२९ जानेवारी २०२६
अकोला
पान ३

## या जन्मावर...या जगण्यावर शतदा प्रेम करावे... माणूसपणाच्या परिचयाने.... कर्तृत्वाच्या सुगंधाने मरणानंतरही अविस्मरणीय ठरावे..!

महाराष्ट्राच्या राजगडाचा एक बळकट बुरूज कोसळला...राजकारणातील दबंग नेर्तृत्व...अनुभवांच्या कसोटचांनी परिपक्व ठरलेले एक अभ्यासू कठोर प्रशासक ,सामाजिक विकासाचा गतिमान झंझावात.....घड्याळाच्या काटयांवर धावणारा शिस्तबध्द...समाजशील विकासपुरुष अजितदादा पवार अकस्मात गेले...त्यांचा परिवारच नाही, तर सारा महाराष्ट्र पोरका झाला. अनाचार,पक्षपाताविरूध्द लढणारी सत्त्याची दादागीरी क्षितीजापलिकडे गेली...नियतीच्या उदरात शांत झाली...! दादा आपण बारामतीत आलात पण महाराष्ट्राला आज खरी गरज असतांनाच या चुकीच्या वेळेला आपण निघून गेलात....विश्वासाच्या घड्याळाचे काटे अचानक कसे काय फिरले? हे प्रश्न आता कुणाला विचारावेत ? सगळं संपलं...राजकारणाचं माळरान आता उजाड झालं..... आपणास अंतरंगातल्या दु:खद भावनांची स्नेहपूर्ण श्रध्दांजली..... ओम शांत...शांती....शांती!!!

**–संजय एम.देशमुख**
संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष–लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ व समस्त पदाधिकारी

# महाराष्ट्राच्या राजकारणातील ‘वाघ’ माणूस गेला

मा. अजित दादा पवार यांच्या अकल्पित निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणातील चैतन्य व दिलखुलास पणा हरपला आहे. आजच्या दिशाहीन होत चाललेल्या राजकारणात एक आशेचा किरण असलेला, राजकारणावर रुबाबदार पकड असलेला, भविष्यात महाराष्ट्राच्या राजकारणासह विकासास सकारात्मक दिशा देण्याची क्षमता असलेला एक निर्भिड व दमदार ‘ वाघ माणूस ‘ आम्ही गमावला आहे. बोलण्यात परखडपणा व सत्यता असलेल्या या दादा माणसाने महाराष्ट्रातील प्रत्येकाच्या मनात एक प्रेमाचे घर निर्माण केले होते. अशा शब्दात छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शंकरराव वाकोडे व जिल्हा प्रसिद्धीप्रमुख प्रदीप खाडे यांनी आपली आदरांजली वाहिली आहे.

**–शंकरराव वाकोडे**



### अजित दादांच्या जीवनातील ‘ ६ ‘ आकड्याचा असाही योगायोग !

अजित दादा पवार यांच्या जीवनात ‘ ६ ‘ या आकड्याने अभूतपूर्व योगायोग साधला आहे. हा दुमिळ योगायोग वाचकांसाठी सादर केला आहे अ. भा. लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रदीप खाडे यांनी. अजित दादांची जन्मतारीख आहे २२ जुलै १९५९. त्यांचा मृत्यू झाला २८ जानेवारी २०२६ रोजी. त्यांच्या या जीवन कालावधीत त्यांना लाभलेल्या आयुष्याच्या दिवसांची संख्या मोजली असता ती भरते ६६ वर्षे, ६ महिने आणि ६ दिवस. या आकड्यात चार वेळा ६ येतो. महाराष्ट्राचे सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री बनण्याचा मानही दादांकडेच आहे. ते विविध मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळात ६ वेळा उपमुख्यमंत्री राहिले आहेत. यातही ६ आहेतच. सर्वाधिक कमी कालावधी करिता उपमुख्यमंत्री राहण्याचा योगही दादांच्याच नावावर जमा आहे. २३ नोव्हेंबर २०१९ ते २८ नोव्हेंबर २०१९ हाच तो कालावधी. हा कालावधी सुद्धा ६ दिवसांचाच आहे. दादांचा मृत्यूही झाला २०२६ सालात. या सालात ही शेवटी ६ आहेतच. त्यांच्या विमानाचा अपघात होऊन स्फोट झाला तो सकाळी ८ वाजून ४६ मिनिटांनी. आणि त्याच क्षणी दादांचा मृत्यूही झाला. या मृत्यूच्या वेळेतही शेवटचा आकडा ६ आहेच. दादा आज दौऱ्यावर जाण्यासाठी मुंबई येथून घरातून निघून गाडीत बसले तेव्हा वाजले होते घड्याळात सकाळचे ६ . या वेळेतही ६ चा आकडा आहेच. २०२४ सालात झालेल्या विधानसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघात एकूण मतदान झाले २ लाख, ७३ हजार, ११६. या मतदानातही शेवटचा आकडा ६ आहेच. यापैकी दादांना मते मिळालीत १ लाख, ८१ हजार, १३२. त्यांना मिळालेल्या या मतदानाची आडवी बेरीज केल्यास ती येते १६. यातही शेवटी ६ आहेच. दादांना मिळालेल्या या मतांची टक्केवारी काढल्यास ती येते ६६ टक्के. या टक्केवारीतही दोन ६ आहेतच. दादांच्या व त्यांच्या पत्नीच्या नावांची अक्षरेही आहेत प्रत्येकी ६ च. असा हा ६ आकड्याचा अभूतपूर्व योगायोग सांगितला आहे.

**–प्रदीप खाडे**

### अजित पवार के निधन से राज्य ने एक ऐसे नेतृत्व को खो दिया – मदन



महाराष्ट्र के उपमुख्यमंत्री अजित पवार के निधन से राज्य ने एक ऐसे नेतृत्व को खो दिया है, जिसने परिवार, राजनीति, संस्कार और कर्तृत्वइन सबका अद्भुत समन्वय अपने जीवन में साकार किया। उनका जाना पूरे महाराष्ट्र के लिए अपूरणीय क्षति है।वर्ष १९८२ से वे सक्रिय राजनीति में कार्यरत थे। वे महाराष्ट्र के इतिहास में सबसे अधिक बार उपमुख्यमंत्री रहे। सहकारी साखर कारखाने के संचालक और बैंक अध्यक्ष के रूप में उन्होंने अपनी प्रशासनिक क्षमता का परिचय दिया। १९९१ में बारामती लोकसभा क्षेत्र से सांसद बनकर उन्होंने अपने राजनीतिक जीवन की औपचारिक शुरुआत की, लेकिन बाद के वर्षों में उन्होंने राज्य की राजनीति में निर्णायक भूमिका निभाई।
शरद पवार के नेतृत्व में पले–बढ़े अजित पवार ने महाराष्ट्र के लगभग सभी प्रमुख मुख्यमंत्रियों के मंत्रिमंडल में कार्य किया। अजित पवार केवल एक प्रशासक ही नहीं, बल्कि संवेदनशील और आत्ममंथन करने वाले नेता भी थे। एक अवसर पर अपने कथन से आहत भावना को समझते हुए, उन्होंने यशवंतराव चव्हाण की प्रतिमा के समक्ष आत्मक्लेष आंदोलन कर राजनीतिक शुचिता का उदाहरण प्रस्तुत किया। उनके कार्यकाल में बड़े बांधों के स्थान पर छोटे बैराजों के निर्माण पर जोर दिया गया, जिससे महाराष्ट्र के सूखाग्रस्त क्षेत्रों को वास्तविक लाभ मिला।वे स्पष्ट वक्ता थेइबाहर से कठोर, पर भीतर से फणस की तरह कोमल। उनके व्यक्तित्व का एक स्वाभाविक दरारा था, जिससे सम्मानयुक्त भय सबके मन में बना रहता था। यशवंतराव चव्हाण की छत्रछाया में तैयार हुई महाराष्ट्र की राजनीतिक परंपरा का एक सशक्त स्तंभ आज गिर गया है।पवार परिवार ही नहीं, बल्कि महाराष्ट्र की राजनीति और समाजजीवन को उनके जाने से गहरा आघात पहुँचा है। उनके नेतृत्व से प्रेरित होकर राजनीति में आए, समाजकार्य में रमे, और स्वयं को पूर्णतः समर्पित करने वाले सैकड़ों कार्यकर्ता आज अनाथ से हो गए हैं। यह विस्तृत परिवार उनके बिना अधूरा हो गया है।महाराष्ट्र ने एक सक्षम, संवेदनशील, संस्कारी और धडाडी नेता को खो दिया है। इसी कारण आज पूरा राज्य शोकाकुल है।



### महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री लोकनेते आदरणीय अजितदादांच्या निधनाने तीव्र धक्का बसला–रमेश हिंगणकर

एवढा मोठा लोकनेता आपल्यातून जाणे ही महाराष्ट्रासाठी अतिशय दुर्दैवी घटना आहे. गेल्या ४० वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवातून दादांचे नेतृत्व पुढे आले. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, विलासराव देशमुख आणि आदरणीय शरदचंद्रजी पवार यांच्यानंतर एवढ्या मोठ्या उंचीचा नेता म्हणून दादांकडे बघितले जात होते.
कुशल प्रशासक म्हणून संपूर्ण शासकीय यंत्रणेवर दरारा असणारा एवढा मोठा नेत्याचे अपघाती निधन संपूर्ण महाराष्ट्राला सहन न होणारे आहे. दादांचे आणि माझे व्यक्तिगत संबंध होते. सहकार क्षेत्रात काम करताना दादांशी माझा निकटचा संबंध आला. विशेषतः दादांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय सहकारी संस्थांचा संचालक म्हणून काम करताना मला दादांना अगदी जवळून अनुभवता आले.गत महिन्यात हिदायत पटेलांच्या हत्या प्रकरणातून आम्ही सावरलो नसताना हा दुसरा धक्का सहन न होणारा आहे. ही माझी व्यक्तिगत हानी असून ती कधीही भरून न निघणारी आहे.

### अत्यंत धक्कादायक आणि हृदय विदारक : जावेद जकरिया

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब यांच्या विमान अपघातातील दुःखद निधनाची बातमी अत्यंत धक्कादायक आणि हृदय विदारक आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणाला, विकास योजनांना आणि जनसेवेतील योगदानाला अपूरणीय अशी हानी झाली आहे.अजित दादांनी आपल्या दीर्घ सार्वजनिक जीवनात शेतकरी, गरीब, तरुण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी समर्पितपणे काम केले. त्यांच्या नेतृत्वगुणांना, समजुतीला आणि कर्मठ कार्यशैलीला समाज सदैव स्मरण ठेवेल.या अतिशय दुःखाच्या प्रसंगी मी दिवंगत आत्म्यास शांतीच्या परमेश्वराच्या चरणी प्रार्थना करतो आणि त्यांच्या कुटुंबीय व सर्व अनुयायांना मन:पूर्वक संवेदना व्यक्त करतो.ईश्वर सर्वांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

### दादा म्हणायचे काम सांगा हो काम –अनिल मालगे

दादा म्हटलं की महाराष्ट्राचा एकच दादा अजित दादा हे नाव आज ज्या दराराने घेतल्या जाते ते दादा आज आपल्यात नाही आहेत ही कल्पनाही करवत नाही अजित दादा व माझा संपर्क हा माझे मार्गदर्शक स्वर्गीय तुकाराम भाऊ बिडकर यांच्यामुळे आला मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये तुकाराम भाऊ बिडकर यांच्या समवेत पक्षांमध्ये काम करीत असताना अजित दादा जेवढे बोलायला तेवढेच प्रेमळ अजित दादा यांना भेटण्याचा योग मला वारंवार मुंबईत आला मुंबईमध्ये असताना मी जेव्हा जेव्हा मुंबईला जायचं तेव्हा तेव्हा अजित दादा ची अपॉइंटमेंट घेऊनच जायचो स्वर्गीय तुकाराम भाऊ बिडकर हे आमदार असताना मी त्यांच्या समवेत हर पंधरा–वीस दिवसानंतर मुंबईला जायचं त्यावेळेस विधान भवन मंत्रालय येथे दादांचे दुरून दर्शन व्हायचं त्यानंतरच्या काळात मी ज्या ज्या वेळेस मुंबईला जायचं त्या त्या वेळेस मी त्यांचे स्वीय सहाय्यक यांना पत्र पाठवून अजितदादांची भेट घ्यायचं अजित दादा भेटण्यासाठी सकाळी सहा वाजल्यापासून कार्यकर्ते पदाधिकारी यांना भेट द्यायचे आम्ही सकाळी सहा वाजता त्यांच्या मलबार हिल येथील बंगल्यावर उपस्थित राहायचं अपॉइंटमेंट असलेल्या कार्यकर्ते व नेत्यांना ते भेटायचे त्यानंतर आलेल्या सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांना ते आवर्जून भेटत भेटल्यानंतर तुमचं काम काय माझं एक काम अकोला जिल्हाधिकारी यांच्याशी होता त्यावेळेस स्वर्गीय मनोहर पाटील दांदळे अरविंद घोगरे अमर डिकाव असे आम्ही शिष्टमंडळात गेलो होतो त्यावेळेस अजित दादांनी माझ्या कामासाठी अकोला जिल्हाधिकारी यांना सकाळी सव्वा सहा वाजता फोन लावून अनिल मालगे माझा कार्यकर्ता आहे त्याचं काम करावं व मला फोन करून सांगा काम झालं म्हणून असा फोन केला त्यानंतर दादा मला बोलले तुम्ही अकोला केव्हा जाणार आहात मी त्यांना म्हटलं दादा मी शुक्रवारी अकोला पोहोचत आहे दादा बोलले आज तर बुधवार मी म्हटलं दादा आज तुमची बंगल्यावर ही माझी पर्सनल कामासाठी आपली भेट होती उद्या गुरुवार आहे आपला जनता दरबार असतो त्यामध्ये आपली उद्या सकाळी आमची दुसरी अपार्टमेंट आहे दादा मला हसून बोलले की अरे बाबा आजच काम सांगून द्या आम्ही म्हटलं दादा आमच्या रिझर्वेशन परवाच आहे दादा हसत बोलले ठीक आहे. मी शुक्रवारी अकोला आलो असता अकोला जिल्हाधिकारी यांना भेटायला गेलो भेटायला गेल्याबरोबर जिल्हाधिकाऱ्यांनी अजितदादांचं त्यांना आलेलं पत्र मला दाखवील मी मुंबईवरून यायच्या अगोदर अजितदादांचा पत्र तिथे पोहोचलो मला खूपच अभिमान वाटला की दादाची काम करायची पद्धत त्यानंतर मी स्वर्गीय शिवाजीराव कोरडे यांच्यासोबत महानगर अध्यक्ष निवडी संदर्भात शिष्टमंडळात गेलो त्यावेळेस मंत्रालयाला आग लागली आम्ही अजित दादांच्या मी ऑफिसलाच होतो त्यावेळेस तेथे स्वर्गीय शिवाजीराव कोरडे हे मरण पावले मी पाईपने खाली उतरलो मी खाली उतरल्यानंतर सायंकाळी सात वाजेपर्यंत मी संपूर्ण शोध घेत राहीलो व फोन करत राहलो परंतु शिवाजीराव कोरडे यांचा कुठेही पत्ता लागत नव्हता त्यावेळेस मला माहिती मिळाली सात वाजता मुख्य मंत्री यांची पत्रकार परिषद आहे प्रशासकीय कार्यालय मंत्रालयासमोर मी तिथे गेलो तिथे गेल्यावर मी दादांना भेटलो दादांना हकीकत सांगितली त्यावेळेस दादा बोलले तुम्ही त्यांच्यासोबत होतात मी बोलत असताना तेवढ्यात वायरलेस वर मेसेज आला की आपल्या चेंबरला एक डेड बॉडी भेटली आहे हॉस्पिटलला नेलेली आहे त्यावर अजित दादा स्वर्गीय आर आर पाटील जयंत पाटील दिलीप वळसे पाटील तीन ते चार मंत्र्यांना घेऊन हॉस्पिटल ला पोहोचले त्यावेळेस हॉस्पिटलमध्ये अवस्थेत एक डेड बॉडी मला दिसली त्यानंतर अजितदादांनी तेथील जखमी लोकांची विचारपूस केली.

## थोडक्यात

### गोरक्षण संस्थानच्या भागवत कथेत आज नंदोत्सव



**अकोला** : श्री गोरक्षण संस्थान, भारतीय संस्कृती प्रचार परिषद आणि श्री भागवत सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने गोरक्षण रोडवरील गोरक्षण संस्थानात सध्या चालू असलेल्या माता चैतन्य मीरा यांच्या भागवत कथेला भक्तांचा प्रखर प्रतिसाद मिळत आहे.कथेत मंगळवारी माता चैतन्य मीरा यांनी भागवताद्वारे भक्तीची महिमा प्रतिपादित करून कथेचे संगीतमय वाणीने निरूपण केले. सुंदर आणि संगीतमय वातावरणात भक्तांमध्ये भक्तीची लहर उसळली. आज बुधवार, दि. २८ जानेवारीला सायंकाळी ५ वाजता नंदोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात कृष्णजन्म साकार करण्यात येईल. सर्व स्त्री–पुरुष भक्तांना या नंदोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन गोरक्षण संस्थान, भारतीय संस्कृती प्रचार परिषद आणि श्री भागवत सेवा समितीचे सेवकांनी केले आहे.

## धावपळीच्या काळात सात दिवसात शिका खुश राहण्याची शैली

तेल्हारा : प्रजापीता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय तेल्हारा च्या वतीने दि. ५ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी या सात दिवसात दररोज सायंकाळी ६ ते ७:३० वाजेपर्यंत ‘तणावमुक्त जीवन एवं सफलता के सात कदम‘ या विषयावर छ्तीसगड राज्यातील बिलासपूर येथील सुप्रसिद्ध प्रवचनकार ब्रह्माकुमारी राखी दीदी यांचे विशेष प्रेरणादायी प्रवचन आयोजित केले आहे.धावपळीच्या युगात काही आनंदाचे क्षण शोधण्यासाठी या दिवसात आनंदी राहण्याची जीवनशैली अनुभवण्याची आणि आनंदी क्षण प्रत्यक्ष जीवनात उतरविण्याची मोठी संधी तेल्हारा वासियांना मिळणार आहे. दररोज च्या नित्य दिनचर्येतून सायंकाळी दीड तास वेळ काढल्यास प्रत्येकाच्या जिवनात अमूलाग्र बदल घडून येईल. आध्यत्मिक ज्ञान आजच्या वैज्ञानिक युगात किती आणि कसे महत्वाचे आहे याचे शास्त्रीय विवेचन आणि विश्लेषण ब्रह्माकुमारी राखी दीदींच्या सुमधुर वाणीतून एकण्यास मिळणार आहे. ५ ते ११फेब्रुवारी या सात दिवसात जीवनातील अनेक समस्यावर समाधान शोधन्याचा प्रयत्न केला जाईल. ५ फेब्रुवारी पहिल्या दिवशी ‘तणावमुक्त कार्यशैली‘ ६ फेब्रुवारीला ‘स्वयं की पहचान‘, ७ फेब्रुवारी तिसऱ्या दिवशी ‘रिलेशनशील मानजमेंट और टीम वर्क‘, ८ फेब्रुवारी ‘निर्णयशक्ती और नेतृत्व क्षमता‘ ९ फेब्रुवारी पाचव्या दिवशी ‘वर्क लाईफ बॅलन्स‘ १० फेब्रुवारीला ‘डिजिटल डिटॉक्स‘ व ११फेब्रुवारी सातव्या दिवशी ‘मौन की परिभाषा‘ हे सात दिवसाचे सात विषय म्हणजे आनंदी, समाधानी आणि खुश राहण्यासाठी सात कदम असणारे आहेत. राखी दीदी यांच्या कर्यक्रमातून अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले असून आपणही जर कोणत्याही कारणाने स्वतःला किंवा परिवाराला दुःखी समजत असाल, विनाकारण च्या चिंतेने त्रस्त असाल किंवा स्वतःतील उणीव, कमतरता यामुळे स्वतःला अपयशी समजत असाल तर आपण नक्की या सात दिवसाच्या प्रवचनमालेचा न चुकता लाभ घ्यावा असे आवाहन तेल्हारा ब्रह्माकुमारीज सेवा केंद्राच्या संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी प्रमिला दीदीजी यांनी केले आहे

## टाकळी खुरेशीचे सेवाधारी पंढरपूरच्या विठ्ठल–रुख्मिणीच्या सेवेत

**▪बाळापुर,दि.२८ (प्रतिनिधी)▪**

बाळापूर तालुक्यातील टाकळी खुरेशी येथील श्री संत गजानन महाराज मठ सेवा समितीच्या वतीने विदर्भवासी सेवाधारी गट १४ वर्षापासून पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भावीक भक्तांसाठी सेवा करीत आहेत या कार्तिकी वारीला या सेवा गटाला १५ वे वर्ष सुरु झाले आहे हिच परंपरा कायम ठेवत माघ वारीच्या यात्रेनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर पंढरपूर येथे २२ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत सेवा देण्यासाठी सेवाधारी रुजू झाले आहेत.

टाकळी खुरेशी येथील श्री संत गजानन महाराज मठाचे उपाध्यक्ष सुभाष घोगरे यांच्या समवेत शेकडो सेवेकरी श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर पंढरपूर येथे सेवा देत दिवसेंदिवस सेवाधारिंच्या संख्येत वाढ होत असुन यामध्ये, महिलांचाही समावेश आहे या सेवा गटात सेवाधारिंचा आकडा ५००० च्या वर पोहोचला आहे या सेवेमध्ये दर्शन मंडप व दर्शन बारिमध्ये भक्तांना चहा, खिचडी बनविणे व वाटप करणे, आपत्कालीन विभागामध्ये धूम्रपान तपासणी व मंदिर



गाभारा व परिसर पुर्ण स्वच्छता, कार्यालयीन पैसे जुळिवणे, लाडुप्रसाद पॅकिंग करणे, नित्योपचार सेवा यासाह इतर सेवा हा गट देत आहे.

या श्री संत गजानन महाराज मठ सेवा समितीचे अध्यक्ष सर्वश्री सुभाष रामकृष्णा घोगरे यांच्यासह, हरिदास सरोदे, शिवशंकर चव्हाण, संजय अग्रवाल, शांताराम पिसे,बाळूभाऊ सरकटे,विजय ताले,उमाशंकर कोल्हे,पद्माकर पुंडकर,योगेश घोगरे, अर्जुन घोगरे,पांडुरंग पोहरे, शिवाजी शिंदे, गजानन लोंढे, गजानन बायस्कार, राजेश्वर वैराळे, विनायक वैराळे, डा सदाशिव वेते, रामा घाटे, गजानन पारिसे,ज्ञानेश्वर सरकटे, कैलास जोगदंड,विनायक सावंत,गोटूराम मुऱ्हे,मुक्ताताई मांगटे, रेखा मगर,सारिका चव्हाण,प्रियंका जुबड,नंदा नागवे, रेखा गायकवाड,यांचा समावेश असुन, हे सेवेकरी टाकळी, नांदखेड,व्याळा, अंदुरा,वाघरूळ जालना, सिंदगी, लाख, हिंगोली, पाडसूळ, गुंडेश्वर, देवरी, निराट, औंढा नागनाथ,बोरगाव वैराळे, मोरगाव सा, शेगाव मोरगाव,चांदखेड,निंबा, भोकरदन, या भागातील आहेत.



## मराठा पाटील समाज संवाद पदयात्रेचा वाडेगावात भव्य समारोप वैचारिक प्रबोधन, सामाजिक संवाद व एकतेचा जागर

अकोला : मराठा पाटील समाजात वैचारिक जागृती, सामाजिक संवाद आणि संघटित एकतेची भावना दृढ करण्याच्या उदात्त उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या मराठा पाटील समाज संवाद पदयात्रेचा प्रजासत्ताक दिनी, सोमवार २६ जानेवारी २०२६ रोजी वाडेगाव येथे अत्यंत उत्साहात, भक्तिभावात आणि प्रेरणादायी वातावरणात भव्य समारोप झाला.

ही पदयात्रा स्व. राजदत्त गुरुदत्त मानकर, संस्थापक अध्यक्ष मराठा पाटील समाज संघ, तालुका बाळापूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आली होती. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजदत्त मानकर यांचा जन्मदिवस हा संघटनेचा स्थापना दिवस म्हणून जाहीर करण्यात आला.

संघटनेचा पहिला वर्धापन दिन या ठिकाणी संपन्न झाला.

१७ जानेवारी २०२६ रोजी काजीखेड येथून प्रारंभ झालेल्या या संवाद पदयात्रेने तालुक्यातील विविध गावांमधून मार्गक्रमण करत समाजातील प्रश्न, अपेक्षा, अडचणी आणि उपाययोजनांवर थेट जनसंवाद साधला. गावोगावी समाज बांधवांशी संवाद साधत, सामाजिक जाणीव जागृती करत ही पदयात्रा वाडेगाव येथे दाखल झाली.

समारोपाच्या दिवशी सकाळी योगेश पाटील भटकर यांच्या निवासस्थानावरून टाळ–मृदुंगाच्या गजरात, वारकरी परंपरेची अनुभूती देणारी संवाद पदयात्रा मिरवणूक वाडेगावच्या प्रमुख मार्गांवरून मार्गस्थ झाली.

जागोजागी रांगोळ्यांनी सजलेले रस्ते, महिलांनी कुमकुम–तिलक लावून केलेले औक्षण, तर वारकऱ्यांच्या अभंग–भजनांनी संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. चौका–चौकात पदयात्रेचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. पद यात्रेचा श्री जागेश्वर मंदिर, समारोप करण्यात आला. स्व. राजदत्त मानकर यांच्या त्रेपणव्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आले. यावेळी पदयात्रेत सहभागी झालेले मराठा पाटील समाज संघाचे अध्यक्ष शरद वानखडे, वसंतराव पोहरे शशिकांत नकासकर मोहन सरप गजानन हरणे, देवानंद साबळे रुपेश पटोकार मधुसूदन माळी मधुसूदन टिकार प्रशांत गायकवाड महेश लांडे धनंजय नेमाडे गणेश मुरूमकर अशोक नळकांडे हिम्मतराव मेटांगे विठ्ठल नळकांडे दत्तात्रेयभाऊ पाटील स्वामी मानकर यांच्यासह समाजाचे मान्यवर अशोक अमानकर, सेवाग्राम ताथोड, संदीप पाटील कृष्ण अंधारे, बाळासाहेब ताथोड पप्पू पाटील तिडके आदी समाजातील मान्यवर मंचावर उपस्थित होते.

महासागर
•गुरुवार,दि.२९ जानेवारी २०२६
अकोला
पान ६

## रेल्वेने चिरडून मृत्यू

अकोला : डाबकी रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गायगाव अकोला येथे खाली जाणाऱ्या रेल्वे मार्गावर एका अज्ञात पुरुषाचा रेल्वेने चिरडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी डाबकी रोड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. २६ जानेवारी २०२६ रोजी खाली जाणाऱ्या गाडीचे रेल्वे चालक राजेश्वर प्रसाद यांनी संपर्क यंत्रणेद्वारे की.मी. ५७५/०८ या ठिकाणी एका अज्ञात व्यक्तीचा रेल्वे अपघात झाल्याची माहिती दिली.

# सर्वार्थाने आत्मनिर्भर भारत देश घडविण्याची जबाबदारी युवा पिढीने स्वीकारावी : कुलगुरू डॉ. शरद गडाख

## अकोला कृषी विद्यापीठाने अत्योत्कृष्ट आयोजनाची परंपरा अबाधित राखली !

▪अकोला,दि.२८ (प्रतिनिधी)▪

युवकांचा देश म्हणून संपूर्ण विश्वावर छाप पाडलेल्या आपल्या देशाची युवा शक्ती आता शैक्षणिक, सामाजिक, वैज्ञानिक, अध्यात्मिक दृष्ट्या संस्कारीत झाली असून आत्मनिर्भरतेकडे अग्रेसीत आपल्या देशाचे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी तत्पर असल्याचे आशादायक प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी केले.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा. आचार्य देवव्रत यांचे मार्गदर्शनात महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठातील (कृषी व अकृषी) विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होण्यासोबतच कौशल्य व नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी तसेच अचानक घडणाऱ्या नैसर्गिक अथवा मानवनिर्मित घटनांमुळे होणारी जीवितहानी, मालमत्तेचे नुकसान व सामाजिक अव्यवस्था टाळण्यासाठी राज्यातील विविध महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, कर्तव्य आदींची जाण अधिक भक्कम करणेसोबतच त्यांना कोणत्याही विपरीत परिस्थितीला सामोरे जाणेसाठी व पर्यायाने स्वतः सह समाजहितासाठी तत्पर राहणे साठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सक्षम स्वयंसेवकांची प्रशिक्षित फौज निर्माण करण्याचे हेतूने 'महाराष्ट्र




राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिर आव्हान (चान्सलस ब्रिगेड) २०२५–२६' या सात राज्यस्तरीय दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजनाची जबाबदारी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाकडे देण्यात आली होती. दिनांक १७ ते २४ जानेवारी २०२६ दरम्यान विद्यापीठाच्या अकोला येथील मुख्यालयी आयोजित 'महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिराचे' समारोप प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.सात दिवसीय शिबिरातून वैयक्तिक आणि परिवाराची आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षा, सामुदायिक ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन, भूकंप, वीज पडणे, चक्रीवादळ, भूस्खलन, जंगलातील वणवा आदी प्रसंगी कांय करावे आणि कांय नाही त्यावर कृतियुक्त मार्गदर्शन करण्यात आले असून यांचा उपयोग समजहितासाठी करावा असा उपदेश देखील कुलगुरू डॉ. गडाख यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना दिला. यांची होती विशेष उपस्थिती डॉ. पंजाबराव देशमुख कृषि कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे अध्यक्षतेत संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिराचे समारोपीय सत्राचे प्रसंगी एन डी आर एफ पुणेचे कमांडंट दीपक तिवारी, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य शिवराम घोडके, विद्यापीठाचे संचालक शिक्षण डॉ. देवानंद पंचभाई, संचालक संशोधन डॉ. शामसुंदर माने, संचालक विस्तार शिक्षण डॉ. धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता कृषी अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे, अधीष्ठाता उद्यानविद्या डॉ. अरविंद सोनकांबळे, निरीक्षण समितीचे सदस्य डॉ.सतीश कोलते, डॉ. हेमंत वऱ्हातकार, डॉ. रामेश्वर कोठावळे, डॉ. मिलिंद काळे, वित्तीय व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. तानाजी चौगुले, भास्कर पाथरे यांचे सह विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे, सहयोगी अधीक्षता निम्न कृषी शिक्षण डॉ. राजेंद्र काटकर, विद्यापीठ अभियंता इंजि.सुनील थोटांगे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे हाडोळे आदींची विचार मंचावर विशेष उपस्थिती होती.

## आरटीओ द्वारा आयोजित रस्ता सुरक्षा सखी कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**अकोला** : रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत आरटीओ कार्यालयाचा अभिनव उपक्रम, अकोला, आरटीओ कार्यालय द्वारा आयोजित रस्ता सुरक्षा सखी कार्यक्रमला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला महिलांच्या रस्ता सुरक्षेसाठी कार्यालयातील महिला मोटर वाहन निरीक्षकांनीआरटीओ कार्यालयात आरटीओ रवींद्र भुयार तसेच सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम २६ जानेवारी च्या प्रजासत्ताक दिनाचे व रस्ता सुरक्षा अभियानाचे औचित्य साधून राबविण्यात आला महिलांमार्फत रस्ता सुरक्षा सखी चा संदेश त्यांनी स्वतः आत्मसात करून हा संदेश त्यांच्या कुटुंबापर्यंत पोचवावा यासाठी रस्ता सुरक्षा सखी द्वारा हा उपक्रम रविण्यात आला उपस्थित महिला वर्गांनी अधिकाऱ्यांना गवई दिली की .वाहन चालविताना नियमाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणार व आपल्या कुटुंब तील सदस्यांना पण त्याबाबत प्रेरित करणार असल्याचे उपस्थित महिलांना यावेळी माननीय सांगितले महिलांसाठी हा विशेष कार्यक्रम महिलांच्या जनजागृती साठी राबविण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्त्री रोग तज्ञ रेखा पाटील होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून दीपमाला भटकर शिक्षण विस्तार अधिकारी जिल्हा परिषद अकोला तसेच देशोन्नतीच्या मनस्विनी चे संयोजिका सविता कुठे तसेच मोटर वाहन निरीक्षक त्रिवेणी गडलिंगे तसेच नारी शक्ती फाउंडेशनच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुमैया अली, पत्रकार निशाली पंचगाव, स्वराज मोटर ड्रायव्हिंग स्कूल च्या संचालिका वैशाली ढगे, लतिका सदापुरे, आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होत्या यावेळी मान्यवरांचे पुष्पगुच्छ व शाल अर्पण करून मोटर वानिरीक्षक त्रिवेणी गालींदे तसेच सहाय्यक मोटर निरीक्षक प्रियंका राऊत सहायक मोटर निरीक्षक मनीषा पांचाळ सहाय्यक मोटवानिरीक्षक स्नेहल पुरी यांनी व्यासपीठावर उपस्थित मान्यवरां चे सत्कार व स्वागत केले, यावेळी रस्ता सुरक्षा बाबत जनजागृती पर प्रश्नमंजुषा ठेवण्यात आली होती रस्ता सुरक्षा बाबत जनजागृती व्हावी.

## बाळापूर तालुका पत्रकार संघ अध्यक्षपदी राजेश्वर वैराळे, सरचिटणीस अमोल जामोदे व कार्याध्यक्ष रफत खान



**बाळापूर** : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्नित बाळापूर तालुका पत्रकार संघाची बैठक दि २५ जानेवारी २०२६ ला माहिती केंद्र कार्यालय बाळापूर येथे जिल्हा उपाध्यक्ष रामदास वानखडे, जेष्ठ पत्रकार रमेश ठाकरे यांच्या उपस्थितीत पार पडली त्यामध्ये बाळापूर तालुका अध्यक्ष म्हणून राजेश्वर वैराळे, कार्याध्यक्ष म्हणून काझी रफत खान तर सरचिटणीस म्हणून अमोल जामोदे यांची सर्वानुमते अविरोध निवड करण्यात आली उपाध्यक्ष म्हणून गजानन सुरजसे, हमीद्दीन ग्यासूद्दीन, कोषध्यक्ष म्हणून दिपचंद चव्हाण, सहसचिव म्हणून राजेंद्र थेटे, संघटक म्हणून संदीप भारसाकळे,सहसघटक म्हणून अमोल साबळे, प्रसिद्धी प्रमुख म्हणून विनायक वैराळे, कार्यालय प्रमुख म्हणून रवी वखरे यांची एकमताने अविरोध निवड करण्यात आली मावळते तालुका अध्यक्ष दिपक रोंदळे यांनी आपल्या कार्याचा आढावा यावेळी दिला नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा सत्कार रामदास वानखडे, रमेश ठाकरे, मोत्तेबर देशमुख,शहाबाज देशमुख, दिपक रोंदळे, उमेश जामोदे यांनी सत्कार केला आणि आगामी काळात तालुका पत्रकार संघाच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## दिव्यांग सेवेकरी पंकज जायले यांना शासनाचा 'दिव्यांग व्यक्ती प्रेरणा पुरस्कार'

▪अकोला,दि.२८ (प्रतिनिधी)▪

दिव्यांग व मूकबधिर वर्गासाठी जिल्ह्यात अनेक वर्षांपासून अविरत सेवाकार्य करणाऱ्या स्थानीय सहकार नगर येथील रहिवासी पंकज जगतराव जायले यांना राज्य शासनाच्या दिव्यांग कल्याण मंत्रालयच्या वतीने दिल्या जाणारा 'दिव्यांग व्यक्ती प्रेरणा पुरस्कार'प्रदान करण्यात आला.प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद मध्ये आयोजित सोहळ्यात जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या हस्ते,जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी डॉ तुषार जाधव व अन्य प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत पंकज जायले यांना 'दिव्यांग व्यक्ती प्रेरणा पुरस्कार' शिल्ड,प्रमाणपत्र व रोख दहा हजार रुपयांचा धनादेश प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पंकज जायले हे अनेक वर्षापासून दिव्यांग व मूकबधिर वर्गाची सर्वकष सेवा करीत असून दिव्यांगांच्या रोजगारासाठी मोलाची कामगिरी ते बजावीत आहेत. याव्यतिरिक्त यांचा सामाजिक सेवा कार्यातही हातखंडा असून जिल्ह्यातील दिव्यांग व मूकबधिर असो.चे चेअरमन म्हणून



सेवारत आहेत. त्यांनी अनेक वेळा दिव्यांग व मूकबधिर वर्गासाठी विविध उपक्रम राबवून त्यांच्या विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे उल्लेखनीय सेवा कार्य बघून शासनाने त्यांना हा मोलाचा पुरस्कार प्रदान केला आहे. हा पुरस्कार संपूर्ण दिव्यांग व मूकबधिर बांधवांना समर्पित करण्यात येत असल्याचे आपल्या सत्काराला उत्तर देताना जायले यांनी यावेळी सांगितले.त्यांना मिळालेल्या या उपलब्धी बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## ग्रामपंचायत खामखेड येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर
### रुग्णांनी घेतला शिबिराच्या लाभ



**पातूर:** डॉ. श्रीकृष्ण ढोणे द्वारा संचालित महात्मा फुले मोफत दवाखाना पातूर व ग्रामपंचायत खामखेड यांचे वतीने मोफत आरोग्य रुग्ण तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या आरोग्य तपासणी शिबिराला चांगला प्रतीसाद मिळाला. डॉ. श्रीकृष्ण ढोणे यांचे मार्गदर्शनात सुरू केलेल्या महात्मा फुले मोफत दवाखाना व ग्रामपंचायत खामखेड व ग्रामस्थ यांचे वतीने २५ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये रुग्णांनी शिबिराचा लाभ घेतला. यावेळी रुग्णांना आवश्यक औषध गोळ्याचे वितरण करण्यात आले. यासाठी खामखेडच्या कर्तव्यदक्ष सरपंच, उपसरपंच, व ग्रामपंचायत सदस्य तसेच सचिव यांचे मार्गदर्शनात व महात्मा फुले दवाखान्याचे कर्मचारी व ग्रामस्थ यांनी घेतलेल्या अथक परिश्रमामुळे आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी करण्यात आले.

## अडगांव बु येथे विविध ठिकाणी ध्वजारोहण संपन्न



**अडगांव बु** : तेल्हारा तालुक्यातील अडगांव बु येथील गांधी चौक मधील ध्वजारोहण प्रथम नागरिक सरपंच सौ. शोभा खंडारे यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी, उर्दू शाळा चे विद्यार्थी शिक्षक गावातील गणमान्य व्यक्ती व गावकरी उपस्थित होते.येथील ग्रामपंचायत कार्यालयात यावर्षी प्रतिष्ठित नागरिक अशोक ढोकणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सरपंच उपसरपंच गटनेता ग्रामपंचायत सदस्य ग्रामसेवक ,कर्मचारी, तलाठी, जिल्हा परिषद महाविद्यालयात कनिष्ठयेथील जिल्हा परिषद महाविद्यालय येथे प्राचार्य चारुदत्त मेहरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येऊन शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरीक,शाळा समिती अध्यक्ष ,सदस्य शिक्षक वृंद, कर्मचारी, विद्यार्थी, गावकरी उपस्थित होते. शिवाजीनगर ग्रामपंचायत लागूनच असलेल्या शिवाजीनगर येथे महात्मा फुले चौकात ध्वजारोहण सरपंच सौ.गायत्री चीम यांच्या हस्ते संपन्न झाले तर ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंच गुलाम आरीफ यांच्या हस्ते संपन्न झाले.

## निधन वार्ता
### पुष्पाबाई हरणे



**पातुर:** येथील सिदाजी महादेवराव हरणे यांच्या पत्नी सौ पुष्पाबाई सीदाजी हरणे राहणार कान्होबा चौक, पातुर वय ६५ यांचे २७ जानेवारी मंगळवार रोजी दुपारी २ वाजता निधन झाले. त्यांचे पार्थिवावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name
-- From --
**MADHAVI KAMALAKAR KULKARNI**
--TO--
**ADITI DINESH DHARASHIVKAR**
My Original DOB is -
**(28/07/1970)**
My Residential Address is
-- D/O Kamalakar Ganesh Kulkarni Smrutigandh Behind Ice Factory Kela plot Jatharpeth Akola 444005 Maharashtra

## रेडक्रॉस सोसायटीचा प्रजासत्ताक दिन सोहळा




**अकोला** –इंडियन रेडक्रॉस सोसायटी येथे शहरातील वैद्यकीय क्षेत्रातील सुप्रसिद्ध डॉ. ज़िशान हुसैन यांच्या हस्ते ध्वजारोहण करून प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशात खऱ्या अर्थाने प्रजेची सत्ता आणणारा हा दिवस सर्व भारतीयांसाठी गौरवास्पद आहे असे प्रतिपादन कार्यक्रम प्रसंगी आपल्या सत्काराला उत्तर देताना नवनिर्वाचित नगरसेवक डॉ. जिशान हुसैन यांनी दिले.

तसेच संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक करीत आपल्याला सुद्धा सेवा देण्याची इच्छा असल्याचे सांगितले.प्रारंभी रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन प्रा. डॉ. किशोर मालोकार, व्हॉइस चेअरमन ॲड महेंद्र साहू, अँड सुभाषसिंह ठाकूर, ॲड सुभाष मुंगी, मानद सचिव प्रभाजीत सिंह बछेर, रामहरी डांगे, राजेश जालान, संदेश रांदड, यांच्या हस्ते डॉ. जिशान यांचा सत्कार करण्यात आला.संचालन कपिल रावदेव यांनी केले. कार्यक्रमला शेख नावेद शेख इब्राहिम, मो. शकील,गजानन खेंडकर,डॉ. संदीप चव्हाण, अन्सार खान,संदीप अग्रवाल, मनोहर गुरनानी, अब्दुल हक पटेल, माजीद भाई,प्रकाश जेना, कैलाश भाऊ , पुष्पाबाई डोंगरे, मंदा डोंगरे, मंगला डोंगरे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## देवी हीच सृष्टीची निर्मिती:पु अंबरीश महाराज

### केशवनगर परिसरातील श्रीमद देवी भागवत कथेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला** : माता जगदंबा हीच खऱ्या अर्थाने सृष्टीची निर्माती असून ती निर्मिती,पालन व संहार करणारी आदिशक्ती अर्थात पर ब्रह्म आहे.अश्या पावन देवीचे देवी भागवत हे शाश्वत सुख प्रदान करते.म्हणून भक्तांनी नित्य या देवीभागवतचे श्रवण करण्याचा हितोपदेश भागवताचार्य पू अंबरीश महाराज जोशी यांनी केला.

श्री हरिहर सद्गुरु शक्तीपीठ, संभाजीनगर संचालित श्री जगदंब परिवार अकोलाच्या वतीने स्थानीय केशवनगर परिसरातील श्री मारुती मंदिर प्रांगणात सुरू असलेल्या श्रीमदब देवी भागवत सप्ताहात भागवताचार्य पू अंबरीश महाराज जोशी सोनईकर यांनी मंगळवारी कथेचे द्वितीय पुष्प गुंफले.त्यांनी या सत्रात सुतजी ने ऋषींना देवीच्या अगाध शक्तीचा प्रसंग साकार करीत मधू केठभ राक्षस वधाची गाथा प्रतिपादित केली. पू. अंबरीश महाराज यांनी यावेळी गुरू महिमा, गुरु भक्ती कशी करावी हे उदाहरणासहीत श्रोत्यांना सांगितले तसेच गुरु भक्तीची सुंदर पदे ओजस्वी वाणीतून सादर करीत आई जगदंबेची सुंदर पदे गायिली.या कथेत 'माय भवानी तुझे लेकरू कुशीत तुझिया घेई, सेवा मानून घे आई' हे गीत नाद ब्रह्म अकादमी ने सादर करून श्रोत्यांची मने जिंकलीत.यावेळी अध्याय नुसार बाल गोपालांनी नाटिका सादर केल्यात.या कथेत दूरवरच्या भक्तांनी आपली उपस्थिती दर्शविली. कथास्थळी पंचकुंडात्मक शतचंडी याग उत्सव होत असून त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.दिनांक २ फेब्रुवारी पर्यंत नित्य सायं ५–३० ते रात्री ८ वाजेपर्यंत आयोजित या देवीभागवत कथेचा समस्त भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन श्रीजगदंब परिवार अकोल्याच्या वतीने करण्यात आले.

## क्रांती युवक मंडळाद्वारे प्रजासत्ताक दिनानिमित्त उत्साहात ध्वज वंदन आणि वृक्षारोपण



**अकोला–** रामदास पेठेतील क्रांती युवक मंडळाद्वारे ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिक प्रा. डॉ. सोभागमल भंडारी यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण व वृक्षारोपणचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते भारतमाता, वीर सावरकर व सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. डॉ. श्रीपाद देशपांडे यांनी भारतीय संस्कृती बद्दल दोन शब्द सांगितले व युवा पिढीला संस्कृतीचे जतन करण्याचे आव्हाहन केले. या प्रसंगी क्रांती युवक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री सुनिलभाऊ नागझिरे प्रामुख्याने उपस्थित होते.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येनी रामदास पेठेतील प्रतिष्ठित नगरिकांची उपस्थिति लाभली होती. क्रांती युवक मंडळाचे कार्यकर्ते प्रभु जोशी, ओम सारडा, गिरिधर गांधी, सुधीर सोमण, संजय चिंचोळकर, निनाद गावंडे, प्रसाद भोजने, गणेश बोदडे, रवि बनकर, सचिन बचे, आनंद नागझिरे, गौरव देशमुख, अंकुश द्विवेदी, प्रशांत भुईभार, तुषार रेलकर, मंगेश पवार, सागर देशमुख, राहुल राऊत,सागर भोंगले, आशीष टाले, आकाश कनोजिया, सुरेश गोहेल, टीनु पुरोहित, आशीष चौधरी, गोलू राऊत, निलेश राऊत, धनोकार, प्रकाश जसवानी, रिंकू पठारे, सोनू द्विवेदी व इतर गणमान्य या प्रसंगी मोठ्या संख्येनी हजर होते.

RNI NO-46973/1986
Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८
महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक** : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : "पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९" (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# महाराष्ट्राच्या राजकारणातील 'दादा' हरपला!

महाराष्ट्राच्या राजकारणाची कधीही न भरुन निघणारी हानी आज झाली. अजितदादांचे निधन ही बातमी कुणालाही खरी वाटत नाही. परंतु स्पष्ट आणि परखड नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले, यावर विश्वास ठेवावाच लागेल. पण दादांनी संपूर्ण महाराष्ट्राला रडवलं ही सत्य वस्तुस्थिती आहे. उमदा, स्वच्छ मनाचा, बेधडक, जे पोटात ते ओठात असणारा कामाचा माणूस हरपला.

■ जयंत महाजन

दादा म्हणजे महाराष्ट्राचं समाजमन कळालेलं नेतृत्व! दिवसाचे १६-१७ तास सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध राहून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे आव्हान लीलया पेलणारे नेते. दादा म्हणजे महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर तळपणारी जणू तलवारच होती.

दादांच्या राजकारणाची पद्धत पटो न पटो, पण त्यांच्या कामांचा धडाका कुठला विरोधक पण कधीही नाकारू शकला नाही. पहाटे उठून कामाला लागणारा नेता ही तर त्यांची खासियत. लाखो लोकांचा प्रपंच सांभाळणाऱ्या कारभाऱ्याने असा अर्धवट डाव सोडून जाणे खरंच खूप वेदनादायी आहे. त्यांचे जाणे हा घाव वर्मी लागणारा आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राचं खुप मोठं नुकसान झालं. राजकारणातील दादा माणूस आपल्यातून गेला आहे.

राजकारण म्हणजे फक्त सत्ता, पदं आणि आकडे नाहीत, तर राजकारण म्हणजे माणसं, नाती, विचार आणि धाडस आणि या सगळ्यांचं चालतं-बोलतं प्रतीक म्हणजे अजितदादा होते.

शिस्त, परखडपणा, निर्भीड मत मांडण्याची हिंमत आणि निर्णय घेताना कुणाचाही विचार न करता, फक्त राज्याच्या हिताचा विचार करणारा नेता आज काळाच्या पडद्याआड गेला. खरं म्हणजे हे स्वीकारणं फार अवघड आहे. सर्व पक्षांना दादा हवेहवेसे वाटणारे होते. आपल्यातले, आपलेसे वाटणारे नेते होते. म्हणूनच ते फक्त एका पक्षाचे नव्हते, तर ते सगळ्यांचेच दादा होते.



गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन, विलासराव देशमुख यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांच्या रांगेत उभं राहणारं हे व्यक्तिमत्त्व आज इतिहासात जमा झालं. पण मनात, आठवणीत, विचारांत कधीच न मिटणारी पोकळी निर्माण करून गेलं. दादा रागावायचे, ओरडायचे, पण आतून माया असलेला 'माणूस' होते. समोरच्याला झापायचे, पण वेळ आली की, पाठीशी उभे राहणारे होते. म्हणूनच त्यांच्या जाण्याने राजकारण थोडं अधिक पोकळ झालंय.

आज शब्द अपुरे पडतायत आणि डोळे नकळत ओलावतात. कारण असे नेते वारंवार जन्माला येत नाहीत! फटकळ पण जे ओठी तेच पोटी असे मिश्किल बोलणारा, राजकारणात असूनही राजकारणी नसणारा, हो म्हणजे हो नाही म्हणजे नाही असा बाणा असलेला, रुसणारा फुगणारा, एक चांगला माणूस, काही लोकहिताचे करू पाहणारा कार्यक्षम लोकाभिमुख नेता हीच तर त्यांची 'आयडेंटिटी'!

महाराष्ट्राच्या राजकारणात राहून, महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र झटणारे 'दादा' आज पडद्याआड गेले, महाराष्ट्रातील जनतेचं फार मोठं नुकसान झालं आहे. निर्णायक ठिकाणी, निर्णायक वेळी, निर्णय घेण्याची 'निर्णयक्षमता' असणारे 'दादा' आपल्यातून निघून गेल्याने महाराष्ट्रातील उद्योग, सहकार, शिक्षण, सामाजिक क्षेत्राचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक झंझावात, प्रशासनावर जरब असणारे कणखर नेतृत्व, मिश्किल स्वभाव आणि जनसामान्यांचे लाडके दादा आता इथून पुढे दिसणार नाही यावरच विश्वास बसत नाही. 'लोकाभिमुख' नेता आज शांत झाला. बारामतीपासून मंत्रालयापर्यंत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या दादांनी नेहमीच विकासाला प्राधान्य दिले.

सडेतोड बोलणे आणि दिलेला शब्द पाळणे ही त्यांची ओळख महाराष्ट्राच्या राजकारणात सदैव अजरामर राहील. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावरील एक तेजस्वी तारा निखळला आहे.

शिस्त, स्पष्टवक्तेपणा आणि अहोरात्र कष्ट करण्याची त्यांची वृत्ती सर्वांसाठी कायम प्रेरणादायी असेल. राज्याच्या विकासातील त्यांचे योगदान कधीही विसरता येणार नाही. छत्रपती शिवराय, राजश्री शाहू, म. फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांचा पुरोगामी विचार पुढे घेऊन जाणारे अजितदादा नेते होते. पवार कुटुंबीयावरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रावर या दुःखद घटनेने संकट कोसळले आहे, दादांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणात, सहकार, शिक्षण, उद्योग या क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. दादांना भावपूर्ण श्रद्धांजली!

(लेखक हे महासागर मीडिया ग्रुपच्या नाशिक आवृत्तीचे निवासी संपादक आहेत.)

### दादांची राजकीय कामगिरी

अजित अनंतराव पवार (२२ जुलै १९५९ - २८ जानेवारी २०२६) हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एक राजकारणी होते. २ जुलै २०२३ पासून आपल्या मृत्यूपर्यंत ते उपमुख्यमंत्री राहीले. महाराष्ट्रातील एक अत्यंत प्रभावशाली राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते होते. अनेकदा उपमुख्यमंत्रीपद भूषवलेले अनुभवी राजकारणी आहेत. शरद पवार यांचे पुतणे असलेले दादा बारामतीतून सक्रिय होते. नोव्हेंबर २०१९ आणि जुलै २०२३ मध्ये त्यांनी अनपेक्षित राजकीय पावले उचलत सत्तापालटात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांची राजकीय कारकीर्द बारामतीतून सुरू झाली. ते १९९१ मध्ये पहिल्यांदा बारामती मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले होते, परंतु नंतर काका शरद पवारांसाठी त्यांनी जागा सोडली आणि ते राज्याच्या राजकारणात सक्रिय झाले. १९९१ पासून ते सलग महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य राहीले. राज्याच्या राजकारणात त्यांनी जलसंपदा, ऊर्जा, वित्त यांसारख्या महत्त्वाच्या विभागांचे मंत्री म्हणून काम केले. त्यांनी विक्रमी वेळा उपमुख्यमंत्रीपद भूषवले. जुलै २०२३ मध्ये त्यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठी फूट पाडून स्वतःचा गट स्थापन केला आणि शिंदे-फडणवीस सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून सामील झाले. यामागे वैचारिक मतभेद आणि भाजपसोबत जाण्याची भूमिका असल्याचे सांगितले गेले. कठोर प्रशासकीय पकड, वेळेचे नियोजन आणि विकासाभिमुख कामांसाठी ते प्रसिद्ध होते.महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे आणि खो-खो संघटनेचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत राहिले. त्यांच्या राजकीय कारकीर्दीत त्यांनी कायमच महाराष्ट्राच्या सत्तेच्या केंद्रस्थानी राहणे पसंत केले.

# फक्त 'काकांचे पुतणे' की स्वतःची एक पोलादी 'सिस्टम'?

■ दिपक कैतके



## अजित पवारांच्या त्या ऐतिहासिक निर्णयांनी राज्याचा चेहरा कसा बदलला?

महाराष्ट्राच्या राजकारणात 'दादा' या शब्दाला वचक आणि विश्वासाचे वलय प्राप्त करून देणारे नेतृत्व म्हणजे अजित पवार. त्यांच्या निधनाने केवळ एक व्यक्ती नाही, तर प्रशासनाला शिस्त लावणारी एक 'स्वयंचलित यंत्रणा' थांबली आहे.

मी जे बोलतो, तेच करतो... हा त्यांचा बाणा अनेकवेळा वादग्रस्त ठरला, पण त्याच बाण्याने मंत्रालयातील फाईल्सचा वेग वाढवला. एका धडाडीच्या नेत्याच्या कारकिर्दीतील त्या 'मास्टरस्ट्रोक' निर्णयांचा हा खास आढावा.

**१. 'पायाभूत' विकासाचा महामेरूः पुणे ते मुंबई व्हाया मंत्रालय!**

अजित पवारांच्या कार्यशैलीत 'वेळ' हाच सर्वात मोठा घटक होता. त्यांनी घेतलेले काही निर्णय राज्यासाठी मैलाचे दगड ठरले.

मेट्रो आणि स्मार्ट सिटीः पुण्याचे पालकमंत्री असताना 'पुणे मेट्रो'चे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यांनी घेतलेला पाठपुरावा ऐतिहासिक होता. पिंपरी-चिंचवड शहराचा कायापालट करून त्याला 'बेस्ट सिटी' बनवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

ऊर्जा क्रांतीः वीज मंत्री असताना भारनियमनमुक्त महाराष्ट्रासाठी त्यांनी महावितरणमध्ये केलेल्या सुधारणांमुळे आजही अनेक ग्रामीण भागांना अखंड वीजपुरवठा मिळत आहे.

**२. सत्तेची अनपेक्षित समीकरणे आणि तो 'पहाटेचा शपथविधी'**

अजित पवारांच्या राजकीय प्रवासात २३ नोव्हेंबर २०१९ ची ती पहाट कधीही विसरता येणार नाही. राजभवनात देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत घेतलेली मुख्यमंत्रीपदाची शपथ हा भारतीय राजकारणातील सर्वात मोठा 'धक्का' मानला जातो. पुढे २०२३ मध्ये सत्तेत सामील होऊन त्यांनी हे सिद्ध केले की, सत्तेचा रिमोट कंट्रोल जरी कोणाकडेही असला, तर सत्तेचे इंजिन मात्र अजित पवारच आहेत.

**३. 'लेक लाडकी' ते सिंचनाचा आवाका**

अर्थमंत्री म्हणून काम करताना दादांनी केवळ आकडेमोड केली नाही, तर सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतलेः

गुंतवणुकीचा मास्टरः जलसंपदा मंत्री म्हणून सिंचन क्षेत्रात हजारो कोटींची तरतूद करून दुष्काळी भागाला पाणी देण्याचे धाडस त्यांनी दाखवले.

महिला सक्षमीकरणः 'लेक लाडकी' सारख्या योजनांमधून त्यांनी राज्याच्या तिजोरीचा दरवाजा गरिबांच्या मुलींसाठी उघडला.

**४. प्रशासनावर 'दादा'गिरी की शिस्त?**

मंत्रालयात सकाळी ७ वाजता अधिकारी हजर असणे, हे केवळ अजित पवारांमुळेच शक्य झाले.

रोखठोक संवादः काम होणार असेल तर सांगतो, नाहीतर वेळ वाया घालवू नका, हा त्यांचा सज्जड दम अधिकाऱ्यांच्या अंगवळणी पडला होता.

अभ्यासू नेतृत्वः समोर असलेली फाईल न वाचता त्यावर सही करायची नाही, हा त्यांचा नियम होता. त्यामुळेच कोणत्याही विषयावर ते चोख भाष्य करू शकत असत.


**एक अष्टपैलू 'पॉवर हाऊस' शांत झाले!**

बारामतीच्या बँकेपासून ते राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा कष्ट, शिस्त आणि जिद्दीचा होता. सहकार, क्रीडा आणि शेती या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल. 'दादा' गेले, पण त्यांनी मागे सोडलेली 'कार्यपद्धती' येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी प्रशासकीय अभ्यासाचा विषय ठरेल.

# अतिसुरक्षित कवच की काळाची क्रूर थट्टा?









अजित पवारांच्या अपघाताने इतिहासातील ती रक्तरंजित पाने पुन्हा का देशाच्या राजकारणात जेव्हा जेव्हा एखादा झंझावात तयार होतो, तेव्हा नियतीचा घाला त्या प्रवासाला खीळ घालतो का? असा अस्वस्थ करणारा प्रश्न आज अजित पवारांच्या निमित्ताने पुन्हा विचारला जात आहे.

अत्याधुनिक सॅटेलाईट ट्रॅकिंग आणि बुलेटप्रूफ सुरक्षेच्या युगातही, भारतीय लोकनेत्यांचा अंत महामार्गावर किंवा आकाशातच का व्हावा? स्वातंत्र्यापासून आजवर भारताने अनेक पॉवरफुल हिरे अशाच आकस्मिक अपघातांत गमावले आहेत.

**१.आकाशातील ती काळरात्रः हेलिकॉप्टर आणि विमानांचे गूढ अपघात**

भारतीय राजकारणात आकाशमार्ग हा नेत्यांसाठी सर्वात वेगवान पण तितकाच धोकादायक ठरला आहे. अजित पवारांच्या विमान अपघाताने यापूर्वीच्या अनेक जखमा ताज्या केल्या आहेतः

संजय गांधींचा तो लूप (१९८०): भारतीय राजकारणाचे केंद्रबिंदू ठरू पाहणारे संजय गांधी दिल्लीच्या सफदरजंग विमानतळावर विमान कसरतीदरम्यान कोसळले आणि एका युगाचा अंत झाला.

माधवराव सिंधियाः राजपुत्राचा करुण अंत (२००१): ज्यांच्याकडे भावी पंतप्रधान म्हणून पाहिले जात होते, त्या माधवराव सिंधिया यांचे विमान उत्तर प्रदेशातील मैनपुरीमध्ये कोसळले.

वाय. एस. राजशेखर रेड्डी (२००९): आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री असताना त्यांचे हेलिकॉप्टर नल्लामालाच्या जंगलात बेपत्ता झाले. सलग २४ तास संपूर्ण देश श्वास रोखून धरून होता, पण अखेर बातमी आली ती मृत्यूचीच.

जनरल बिपीन रावत (२०२१): देशाचे पहिले सीडीएस, ज्यांची सुरक्षा अत्यंत कडक होती, त्यांचे हेलिकॉप्टर तामिळनाडूच्या कूनूरमध्ये कोसळले. या घटनेने देशाच्या संरक्षण सज्जतेवरही प्रश्न उपस्थित केले होते.

**२. रस्ते अपघातांनी हिरावलेले बुलंद आवाज**

नेते आणि कार्यकर्ते यांच्यातील दुवा असणारे अनेक नेते हे महामार्गावरील वेगाचे बळी ठरले आहेत.

गोपीनाथ मुंडेः विजयाचा जल्लोष दुःखात विरला (२०१४): लोकसभेच्या विजयानंतर अवघ्या आठवडभरात दिल्लीत झालेल्या एका साध्या कार अपघाताने महाराष्ट्राचा लोकनेता हिरावला.

राजेश पायलट आणि साहिब सिंग वर्माः काँग्रेसचे राजेश पायलट (२०००) आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री साहिब सिंग वर्मा (२००७) या दोघांच्याही प्रवासाचा अंत महामार्गावरच झाला.

विनायक मेटे (२०२२): मराठा आरक्षणाचा लढा घेऊन मुंबईकडे निघालेल्या मेटे यांचा एक्सप्रेसवेवर झालेला अपघात आजही संशयाच्या भोवऱ्यात आहे.

**३. घातपात की तांत्रिक बिघाड?**

रेल्वेमंत्री ललित नारायण मिश्रा (१९७५) यांच्या बाबतीत घडलेला प्रकार तर अधिक धक्कादायक होता. समस्तीपूरमधील रेल्वे फलाटावर झालेल्या बॉम्बस्फोटाने सुरक्षा यंत्रणेच्या चिंधड्या उडवल्या होत्या. हे कृत्य घातपात होते की सुरक्षा त्रुटी, यावर आजही चर्चा होतात.

**आता तरी यंत्रणा जाग्या होणार का?**

अजित पवारांच्या बारामती दौऱ्यासाठी निघालेल्या विमानाचा तांत्रिक बिघाडामुळे झालेला अपघात, हा केवळ एक अपघात आहे की व्हीव्हीआयपी प्रोटोकॉलमधील हलगर्जीपणा?

जेव्हा एखादा मोठा नेता विमान किंवा हेलिकॉप्टरने प्रवास करतो, तेव्हा फिटनेस सर्टिफिकेटची तपासणी चोख होते का? हे प्रश्न आता सरकारला द्यावेच लागतील. कारण, प्रत्येक अपघातानंतर आपण केवळ शोक व्यक्त करतो, पण नेत्यांच्या प्रवासाची सुरक्षा आजही वाऱ्यावरच असल्याचे दिसते.

(लेखक हे महासागर मीडिया ग्रुपचे मुंबई येथे मंत्रालय प्रतिनिधी आहेत.)

■ ■ ■

# वसई विरार उपप्रदेशाच्या विकासात अजितदादांचे भरीव योगदान

■ दीपक मोहिते

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे अकाली मृत्यू होणे, ही घटना वसईकरासाठी अत्यंत क्लेशकारक अशीच आहे. वसई विरार उपप्रदेशाच्या विकासासाठी त्यांचा दृष्टिकोन कायम सकारात्मक होता.



वसईचे माजी आ. हितेंद्र ठाकूर हे अपक्ष आमदार असूनही त्यांनी त्यांच्या मतदार संघातील विकासकामाना गेल्या तीन दशकात भरीव आर्थिक निधी दिला. निधी देताना त्यांनी कधीही आमदार कोणत्या पक्षाचा आहे? असा संकुचित विचार केला नाही. वसईचे माजी आ. हितेंद्र ठाकूर हे त्यांच्याकडे हक्काने निधी मागत असत. त्यामुळे वसई, नालासोपारा व बोईसर या तिन्ही मतदारसंघाच्या विकासाला चालना मिळू शकली.

या उपप्रदेशाची पाणीटंचाई दूर करण्यासंदर्भात राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख व अजितदादा पवार या दोघानी आर्थिक निधी देताना कधीही हात आखडता घेतला नाही. त्यांच्या अकाली मृत्यूमुळे वसईकर नागरिकांना प्रचंड धक्का बसला असून, राज्याचे फार मोठे नुकसान झाल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

पालघर जिह्यातील आदिवासी समाजाच्या योजना तसेच रोजगार हमी योजनेला मुक्तहस्ताने ते निधी देत असत. पालघर जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेवरील मजुरांच्या मजुरीची देय रक्कम रखडल्याची बाब त्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी त्वरित मजुरीची थकबाकी असलेले १४ कोटी रु. देण्याचे आदेश दिले. विकासासाठी आवश्यक असलेले निर्णय ते बेधडक व धाडसाने घेत असत.

वसई विरारची पाणीटंचाई दूर करण्यासंदर्भातही त्यांचे मोलाचे योगदान होते. सूर्या पाणीपुरवठा योजना निधी अभावी वर्षानुवर्षे रखडली होती. त्यामुळे संपूर्ण वसई तालुका पाणीटंचाईमध्ये होरपळत होता. पहिला टप्पा मार्गी लागला व आता दुसरा टप्पाही पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. त्यांचा दरारा व अंगी असलेले धाडस, यामुळे अधिकारीवर्गही धडाडीने काम करत असत.

(लेखक हे महासागर मीडिया ग्रुपच्या नाशिक आवृत्तीचे निवासी संपादक आहेत.)

■ ■ ■

# प्रशासकीय दादा...



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती जवळ विमान कोसळून झालेल्या अपघातात निधन झाले. त्यांच्यासह विमानात असलेले सहकारी देखील या अपघातात दगावले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सेवेमुळे, कामानिमित्त दादांशी अनेकदा संबंध येत असे.

त्यांची काही जाणवणारी ठळक वैशिष्ट्ये म्हणजे ते अतिशय वक्तशीर होते. तसेच कामाच्या बाबतीत त्यांना अजागळपणा अजिबात खपत नसे. त्यांच्या रोखठोकपणे बोलण्याच्या सवयीमुळे, विषयाच्या सखोल अभ्यासामुळे त्यांच्याकडे जाणारे अधिकारी अभ्यास करूनच जात असत.

आमच्या बाबतीत बोलायचे झाले तर स्वतः दादांचा शुद्ध लेखनावर फार भर असे. कित्येकदा आमच्या मसुद्यातील ऱ्हस्व दीर्घ, अन्य चुका ते शोधून काढत आणि स्वतःच्या पेनाने दुरुस्त करून मसुदा परत देत असत. खरे म्हणजे, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री यानी इतक्या बारकाईने मसुदा वाचणे अपेक्षित नसते. पण या बाबतीत दादांचा फार कटाक्ष असे.

दादांनी ज्या ज्या खात्यांची मंत्री पदे भूषविली, त्या त्या सर्व पदांना त्यांनी न्याय दिला. बघतो, सांगतो अशी टोलवाटोलवी ते कधी करीत नसत. काम होण्यासारखे असेल तर लगेच झाले पाहिजे आणि होण्यासारखे नसेल तर स्पष्टपणे नाही सांगून मोकळे झाले पाहिजे, असे ते अधिकाऱ्यांना जसे सांगत असत, तसेच ते स्वतः ही आचरणात आणत असत.

वरकरणी कठोर, रोखठोक वाटणारे दादा वेळ प्रसंग पाहून मिश्किलपणे देखील बोलत असत. मुख्यमंत्री पद हुलकावणी देत असल्याबद्दल त्यांच्या मनात खंत असे. स्वतः अनेक वेळा उपमुख्यमंत्री पद भूषवलेले दादा एकदा जाहीरपणे बोलताना, आमची गाडी उपमुख्यमंत्री पदावर येऊनच अडकत असते असे मिश्किलपणे बोलले होते.

काही महिन्यांपूर्वी दादांचे अनेक वर्षे जनसंपर्क अधिकारी राहिलेले आमचे सहकारी संजय देशमुख यांचे अकस्मात निधन झाले, त्यावेळी दादा मुंबईबाहेर होते. पण मुंबईत आल्या आल्या, त्यांनी पहिली गोष्ट केली म्हणजे, ती म्हणजे देशमुख यांच्या घरी जाऊन त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले. काही मदत लागली तर ती हक्काने सांगा, असे म्हणुन धीर दिला. त्यांनी लगेच तशा सूचना त्यांच्या खाजगी सचिवांना दिल्या. आता स्वतः दादाच गेले. त्यांच्याबद्दल लिहू तितके थोडेच. असो. दादांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**देवेंद्र भुजबळ**
**निवृत्त माहिती संचालक**
**नवी मुंबई.**

■ ■ ■

## हा अपघातांचा योगायोग की सत्तेची काळी सावली?

गोपीनाथराव मुंडे गेले,
विनायकराव मेटे गेले,
आज अजितदादा पवार
तीनही घटना रस्त्यावर,
तीनही घटना राज्याच्या राजकारणाला
हादरवणाऱ्या अशा आहेत
हा केवळ योगायोग मानायचा का ?
की महाराष्ट्रात सत्ता इतकी निर्दयी झाली
आहे की दिग्गज नेतेही आता सुरक्षित
नाहीत?
मुंडे सारखा जनाधार असलेला नेता
दिल्लीच्या रस्त्यावर असुरक्षित कसा
ठरतो.?
मेटेसारखा संघर्षशील आवाज
महामार्गावरच कायमचा का शांत होतो ?
आणि आज अजितदादा सारखा सत्तेचा
केंद्रबिंदू,
विमान अपघाताच्या कड्यावर का उभा
राहतो ?
प्रश्न हा आहे कि हे अपघात आहेत की
घातपात ?
प्रश्न सिस्टमच्या निष्काळजीपणाचा आहे.
प्रश्न नेत्यांच्या सुरक्षेचा आहे.
प्रश्न सत्य दडपलं जातंय का ? याचा
आहे,
महाराष्ट्रात जर अपघातच दिग्गज नेत्यांचा
शेवट ठरत असेल, तर सामान्य
माणसाच्या जीवाची किंमत तरी काय ?
आज आरोप नको,
पण उत्तर हवंय.
कारण इतिहास एक गोष्ट शिकवतो,
सत्ता बदलते, पण प्रश्न दाबले गेले तर
ते उद्या अधिक भयंकर स्वरूपात उभे
राहतात.

# वेशीवरच का रोखला गेला बारामतीचा 'किंगमेकर'?

राज्याच्या राजकारणात ज्यांची ओळख 'झंझावात' अशी होती, तो झंझावात आज बारामतीच्या वेशीवरच शांत झाला. उपमुख्यमंत्री अजित पवार आज एका मोठ्या राजकीय मोहिमेवर निघाले होते.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत विरोधकांचे बालेकिल्ले उद्ध्वस्त करण्यासाठी 'दादांनी' जे चक्रव्यूह रचले होते, ते आज पूर्णत्वास जाणार होते. मात्र, ज्या मंचावर विजयाचा गुलाल उधळला जाणार होता, तिथेच आज शोकसागराचा महापूर लोटला आहे.

**'पॉवर'फुल प्लॅनिंगः सभेचे गणित अन् विजयाचे सूत्र!**

अजित पवारांच्या आजच्या दौऱ्यामागे केवळ सभा नव्हती, तर बारामती आणि इंदापूर पट्ट्यात महायुतीचे वर्चस्व सिद्ध करण्याची मोठी रणनीती होती.

**सुपेचा तो 'पहिला वार'**: सकाळी ११ वाजता सुपे येथे होणारी सभा ही पश्चिम महाराष्ट्रातील प्रचाराची दिशा ठरवणारी होती. सुपे जिल्हा परिषद गटात विरोधकांनी मोठे आव्हान उभे केले होते, जे मोडून काढण्यासाठी दादांनी स्वतः मैदानात उतरण्याचे ठरवले होते.

**इंदापूरचे 'टार्गेट'**: दुपारच्या सत्रात इंदापूर परिसरातील उमेदवारांना ताकद देण्यासाठी दादांनी खास 'स्ट्रॅटेजी' तयार केली होती. स्थानिक नेत्यांमधील गटबाजी संपवून त्यांना एकत्र आणण्याची जबाबदारी त्यांनी स्वतःच्या खांद्यावर घेतली होती.

**शेवटचा 'मंत्र' द्यायचा राहूनच गेला!**

आज केवळ जाहीर भाषणेच नव्हती, तर अजित पवार 'वन-टू-वन' संवाद साधणार होते.

**उमेदवारांचे 'ब्रीफिंग'**: बारामतीमधील ३० हून अधिक उमेदवारांना त्यांनी दुपारी २ वाजता चर्चेसाठी बोलावले होते. कोणाला कुठे रसद पुरवायची आणि प्रचाराचा जोर कुठे वाढवायचा, याचा 'मास्टरप्लॅन' दादांच्या खिशात होता.

**जुन्या जाणत्यांची मनधरणीः** पक्षातील जे ज्येष्ठ नेते नाराज होते, त्यांच्याशी आज संध्याकाळी ते प्रत्यक्ष भेटून संवाद साधणार होते. पक्षासाठी एकत्र या, हा त्यांचा शेवटचा संदेश आज कार्यकर्त्यांच्या कानापर्यंत पोहोचूच शकला नाही.

**मंचावर सन्नाटा, कार्यकर्त्यांचा टाहो!**

बारामतीतील ज्या मैदानात कार्यकर्त्यांनी पहाटेपासून गर्दी केली होती, तिथे वातावरण अचानक बदलले. लाऊडस्पीकरवर गाणी वाजवणारे हात थरथरू लागले आणि 'दादा' येणार ही घोषणा देणारे आवाज हुंदक्यांत बदलले.

ज्या खुर्चीवर बसून दादा उमेदवारांचे अर्ज तपासणार होते, ती खुर्ची आज रिकामीच राहिली. बारामतीच्या इतिहासात पहिल्यांदाच सभेच्या मंचावरून एखाद्या नेत्याच्या विजयाऐवजी त्याच्या निधनाची घोषणा करण्याची दुर्दैवी वेळ स्थानिक नेत्यांवर आली.

**राजकीय वलयः महायुतीचे 'कवच' निखळले!**

अजित पवारांचा हा दौरा केवळ निवडणुकीपुरता नव्हता, तर तो महायुतीची ताकद वाढवणारा होता. बारामती, इंदापूर आणि दौंड या तीन तालुक्यांत दादांच्या शब्दावर फिरणारे मतदार आता कोणाकडे पाहणार? हा मोठा राजकीय पेच आता निर्माण झाला आहे.



ज्या 'लोहपुरुषाने' रात्री उशिरापर्यंत मंत्रालयात फाईल्सचा निपटारा केला, त्याचा प्रवास बारामतीच्या मातीचा स्पर्श होण्याआधीच थांबला.

# ओराकडून डायमंड फेस्टिवल २०२६ लाँच



**नागपूर, २८ जानेवारी :** साजरीकरण, अभिमान व प्रेमाने भरलेला सीझन सुरू होणार असताना ओरा फाइन ज्वेलरीने सर्वांना त्यांच्या बहुप्रतिक्षित डायमंड फेस्टिवल २०२६ चा उत्साह अनुभवण्यास आमंत्रित केले आहे. जानेवारीमधील सणासुदीचा उत्साह आणि उत्सवी साजरीकरण प्रजासत्ताक दिनाचा अभिमान व व्हॅलेन्टाइन्स सीझनच्या रोमांसप्रसंगी लाँच करण्यात आलेला डायमंड फेस्टिवल आकर्षक कारागिरी, समकालीन डिझाइन आणि लक्षवेधक मूल्य ऑफरिंग्जचा एकत्र अनुभव देतो. डायमंड फेस्टिवलमध्ये डायमंड ज्वेलरी सेट्सची विचारपूर्वक डिझाइन करण्यात आलेली श्रेणी आहे, ज्यामधून ओराची अचूकता, विश्वास आणि लक्षवेधक आकर्षकतेप्रती कटिबद्धता दिसून येते.

या फेस्टिवलचा भाग म्हणून ग्राहक अनेक विशेष ऑफर्सचा आनंद घेऊ शकतात, ज्या हिऱ्यांचे दागिने खरेदी करण्याचा अनुभव उत्साहित करण्यासाठी डिझाइन करण्यात आल्या आहेत:

डायमंड नेकलेस सेट्सच्या किमतीवर २५ टक्के सूट* प्रत्येक खरेदीवर १० टक्के कॅशबॅक* (*अटी व शर्ती लागू)

डायमंड फेस्टिवलचे ओरा फाइन ज्वेलरीसाठी विशेष महत्त्व आहे, ज्यामधून दर्जा व अस्सलतेप्रती ब्रँडची कटिबद्धता दिसून येते. वैयक्तिक यश साजरे करायचे असो, प्रेमाला साजरे करायचे असो किंवा सणासुदीच्या काळात गिफ्ट द्यायचे असो ओराचे हिरे जीवनातील बहुमूल्य सोबती बनण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत.

# एंडोस्कोपिक स्पाईन शस्त्रक्रियेद्वारे रुग्णाला नवजीवन ; मॅक्स हॉस्पिटलची मोठी कामगिरी



**नागपूर, २८ जानेवारी :** मॅक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल, नागपूर येथील डॉक्टरांनी गेल्या सहा महिन्यांहून अधिक काळ व्हीलचेअरवर अवलंबून असलेल्या ५१ वर्षीय रुग्णाला पुन्हा चालण्यास सक्षम केले आहे. जटिल स्लिप्ड-डिस्कच्यासमस्येवर करण्यात आलेल्या मिनिमली इन्वेसिव्ह एंडोस्कोपिक स्पाईन शस्त्रक्रियेमुळे केवळ त्याच्या तीव्र वेदनांपासून आराम मिळाला नाही, तर काही तासांतच त्याला हालचाल करण्याची क्षमता परत मिळाली. हा यशस्वी उपचार हॉस्पिटलच्या स्पाईन सर्जरी टीमसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

हा रुग्ण उपजीविकेसाठी शारीरिक श्रमावर अवलंबून होता. अनेक वर्षे जड वजन उचलण्याच्या कामामुळे त्याला गंभीर प्रोलॅप्स्ड (स्लिप्ड) डिस्कची समस्या निर्माण झाली. दीर्घकाळ औषधोपचार आणि इतर पारंपरिक उपचार करूनही त्याची प्रकृती सतत खालावत गेली आणि अखेरीस उभे राहणे किंवा चालणेही कठीण झाले. मॅक्स हॉस्पिटलमध्ये दाखल होईपर्यंत अगदी थोडी हालचाल करणेही त्याच्यासाठी वेदनादायक होते आणि नसांवरील दाबामुळे त्याची शारीरिक ठेवणही वाकडी झाली होती.

सखोल क्लिनिकल आणि रेडिओलॉजिकल तपासणीनंतर मॅक्स हॉस्पिटल, नागपूर येथील स्पाईन सर्जरी विभागाने, डॉ.परेश बंग, सीनियर कंसल्टंटस्पाईन सर्जरी यांच्या नेतृत्वाखाली, अत्याधुनिक इंटरलॅमिनर एंडोस्कोपिक डिस्केक्टॉमी करण्याची शिफारस केली. ही मिनिमली इन्वेसिव्ह शस्त्रक्रिया अतिशय छोट्या चिराद्वारे प्रभावित नसांवरील दाब अचूकपणे कमी करते, ज्यामुळे आसपासच्या ऊतींना कमी त्रास होतो.

या प्रक्रियेबद्दल बोलताना डॉ.परेश बंग म्हणाले, एंडोस्कोपिक स्पाईन सर्जरी ही स्पाईन विकारांच्या उपचारांमध्ये एक मोठी प्रगती आहे. हाय-डेफिनिशनदृश्यांमुळे आम्हाला अचूकपणे समस्या असलेल्या भागावर उपचार करता येतात आणि स्नायू व ऊतींना इजा होत नाही. या रुग्णाच्या बाबतीत रक्तस्राव अत्यल्प झाला, मणक्यांची स्थिरता कायम राहिली आणि अतिशय जलद पुनर्वसन शक्य झाले.

या शस्त्रक्रियेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सिंगल-स्टिचतंत्र, ज्यामुळे जवळजवळ रक्तस्राव झाला नाही आणि पाठीच्या स्नायूंना अत्यल्प इजा झाली. शस्त्रक्रियेनंतर लगेचच रुग्णाच्या पायातील वेदना कमी झाल्या आणि काही तासांतच तो उभा राहून चालू शकला. पुनर्वसनाच्या काळात कोणतीही न्यूरोलॉजिकल गुंतागुंत आढळली नाही.

या तंत्रज्ञानाच्या व्यापक फायद्यांवर प्रकाश टाकताना डॉ. बंग पुढे म्हणाले, मिनिमली इन्वेसिव्ह एंडोस्कोपिक स्पाईन सर्जरी काम करणाऱ्या आणि सक्रिय जीवनशैली असलेल्या रुग्णांसाठी विशेषत: फायदेशीर आहे. मोठे चिरे टाळले जातात, रुग्णालयातील मुक्काम कमी होतो आणि पुनर्वसन जलद होते, ज्यामुळे रुग्णांना पारंपरिक ओपन सर्जरीपेक्षा खूप लवकर त्यांच्या दैनंदिन कामकाजात आणि उपजीविकेत परतता येते.

हा यशस्वी उपचार मॅक्स हॉस्पिटल, नागपूरच्या प्रगत आणि रुग्णकेंद्रित स्पाईन केअर देण्याच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे, जिथे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ वैद्यकीय कौशल्य यांच्या साहाय्याने रुग्णांचे जीवनमान सुधारले जात आहे.

# सोनी सबवरील यादें मालिकेतील आपल्या भूमिकेविषयी एकता कौल म्हणते, सृष्टी ही पडद्यावर साकारण्यासाठी अगदी योग्य व्यक्तिरेखा आहे, कारण टी कणखर, हुशार आणि भावनिक स्त्री

**मुंबई, २८ जानेवारी :** भारताची आघाडीची हिंदी जनरल एन्टरटेन्मेंट चॅनल सोनी सब घेऊन येत आहे-हुई गुम यादें एक डॉक्टर, दो जिंदगियां. जगभरात वाखाणल्या गेलेल्या डीओसी या इटालियन मेडिकल ड्रामाचे हे भारतीय रूपांतर आहे. या मालिकेचे अनेक देशांत, तेथील स्थानिक भाषांमध्ये रूपांतर झाले आहे. जीवन, प्रेम आणि ओळख याबाबतीत दुसऱ्या संधीच्या विषयावर बेतलेल्या या मालिकेत डॉ. देव (इकबाल खान) या बुद्धिमान डॉक्टरची कहाणी सांगितली आहे. एका अपघातात आठ वर्षांची स्मृती गमावल्यानंतर डॉ. देव नव्याने आपले विश्व पुन्हा उभारण्याचा प्रयत्न करत आहे.

या कथानकाला अधिक सखोलता देणारी एक व्यक्तिरेखा आहे, सृष्टीची. गुणी अभिनेत्री एकता कौल ही महत्त्वपूर्ण आणि दमदार भूमिका करत आहे. सृष्टी ही डॉ. देवची पूर्वीची पत्नी आहे. एके काळी स्वत: डॉक्टर असलेल्या सृष्टीने आपल्या मुलांच्या संगोपनासाठी वैद्यकीय प्रॅक्टिस सोडून हॉस्पिटलची ॲडमिनिस्ट्रेशनची जबाबदारी सांभाळली आहे. याच दवाखान्यात डॉ. देव काम करत आहे. अनेक वर्षे सृष्टी असे मानत होती की, त्यांचा विवाह विच्छेद होण्याचे कारण डॉ. देव होता. त्यांचा सहा वर्षांचा मुलगा ध्रुव याच्या दुर्दैवी निधनानंतर त्याच्या व्यक्तिमत्त्वात झालेला बदल, त्याचा कठोरपणा, तुटकपणा आणि उद्धटपणा यामुळे त्यांच्या नात्यात दुरावा आला होता. मात्र देवची स्मृती गेल्यानंतर आता तिच्या समोर असलेला देव हळवा, समर्पित आणि तिच्या प्रेमात वेडा असलेला देव आहे. त्यामुळे तिच्या मनात भूतकाळातील जखमा आणि प्रेमाला दुसरी संधी देण्याबाबत आंतरिक संघर्ष चालू आहे.

ही मालिका आणि त्यातील आपल्या भूमिकेविषयी बोलताना एकता कौल म्हणाली, यादें हा केवळ मेडिकल ड्रामा किंवा स्मृती गेल्याची गोष्ट नाही. आपल्या ओळखीचे सर्व काही अचानक हरपल्यानंतर हा स्वत:चा नव्याने शोध घेण्याचा प्रवास आहे. मुळात ही दुसरी संधी देण्याची कथा आहे. जीवन, प्रेम, नाती आणि उद्देश यांना दुसरी संधी देण्याची गोष्ट. मला जेव्हा या भूमिकेचा प्रस्ताव मिळाला, तेव्हा मी खूप खुश झाले, कारण मला अशी भूमिका करायची होती, ज्यात आव्हान असेल, जी मला हलवून सोडेल आणि मला अभिनयकला का आवडते याचे स्मरण देईल. वैयक्तिक आणि सर्जनशील स्तरावर माझी वाढ झाली आहे, आणि आता परतण्यासाठी सृष्टी ही व्यक्तिरेखा मला अगदी योग्य वाटली, कारण ती एक कणखर, बुद्धिमान आणि भावनाप्रधान स्त्री आहे.

यादें मालिका प्रेक्षकांना प्रेम, हानी आणि दुसरी संधी या विषयांच्या प्रांताचा हळुवार प्रवास घडवते आणि त्यातून मानवी मनाची ताकद दाखवते.

# हिमालया वेलनेस आणि आरसीबी महिला संघ यांनी भागीदारी करून भारतातील भविष्यातील महिला क्रिकेटपटू घडविण्यासाठी घेतला पुढाकार



**मुंबई, २८ जानेवारी :** जर तुमची क्रिकेटमधील आदर्श खेळाडू तुमच्याशी थेट संवाद साधून तुम्हाला मार्गदर्शन करू शकली, प्रेरणा देऊ शकली आणि तुमचा प्रवास घडवू शकली,तेही तुमच्या फोनवरून तर? राष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने,भारतात अग्रगण्य असलेल्या फेस वॉश ब्रँड हिमालया वेलनेसने वंडरवूमन ऍकॅडमी(१डरवुमन ऍकॅडमी) या अभिनव डिजिटल मेंटॉरशिप प्लॅटफॉर्मचा शुभारंभ केला आहे.हा उपक्रम आरसीबी महिला संघाच्या सहकार्याने राबवण्यात येत असून, देशभरातील उदयोन्मुख महिला क्रिकेटपटूंना त्यांच्या आदर्श खेळाडूंशी थेट जोडण्याचे उद्दिष्ट आहे.

वंडरवूमन(१डरवुमन) या उपक्रमाच्या यशस्वी वाटचालीवर आधारित ही ऍकॅडमी मुलींना अडचणींवर मात करत त्यांच्या निवडलेल्या क्षेत्रात क्रमांक १ चे होण्यासाठी प्रोत्साहित करते.ही ऍकॅडमी शिक्षण, मार्गदर्शन आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी एक संरचित व्यासपीठ उपलब्ध करून देते.हिमालया वेलनेस देशभरातील इच्छुक तरुण क्रिकेटपटूंना नोंदणी करण्यासाठी आमंत्रित करत असून, त्यांना १०० शिष्यवृत्तींची संधी, तसेच आरसीबी महिला खेळाडूंकडून थेट प्रेरणादायी संदेश, क्रिकेटविषयक माहिती आणि आत्मविश्वास वाढवणारे मार्गदर्शन मिळणार आहे.

या लॉन्चबाबत बोलताना राजेश कृष्णमूर्ती,बिझनेस डायरेक्टर-कन्झ्युमर प्रॉडक्ट्स डिव्हिजन,हिमालया वेलनेस कंपनी, म्हणाले,हिमालयामध्ये आम्ही उद्देशपूर्ण आणि मोजता येणारा परिणाम देणारे उपक्रम राबवण्यावर भर देतो. वंडरवूमन ऍकॅडमी(१डरवुमन ऍकॅडमी) च्या माध्यमातून आम्ही केवळ प्रेरणा देण्यापुरते न थांबता, मुलींच्या शिक्षण, आत्मविश्वास आणि दीर्घकालीन प्रगतीसाठी एक संरचित मार्ग तयार करत आहोत.

रागिनी हरिहरन,मार्केटिंग डायरेक्टरब्यूटी अँड पर्सनल केअर, हिमालया वेलनेस,यांनी सांगितले, वंडरवूमन(१डरवुमन) हा उपक्रम यासाठी तयार करण्यात आला की मुलींनी फक्त आदर्श व्यक्तींकडे दूरून पाहू नये, तर त्यांच्या स्वत:च्या प्रवासात त्यांना खरे मार्गदर्शन मिळावे. तंत्रज्ञान आणि विश्वासार्ह आवाज यांची सांगड घालून ही अकादमी आजच्या पिढीसाठी मेंटॉरशिप अधिक सुलभ, संबंधित आणि परिणामकारक बनवते.

तसेच,अभिषेक अशत, जनरल मॅनेजर ब्यूटी अँड फेस केअर, हिमालया वेलनेस, म्हणाले,वंडरवूमन ऍकॅडमी(१डरवुमन ऍकॅडमी) ही केवळ जागरूकता निर्माण करण्यासाठी नाही, तर कृतीसाठी प्रेरित करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. मार्गदर्शित संवाद, संसाधने आणि शिष्यवृत्तींच्या माध्यमातून आम्ही मुलींना त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यावर पाठबळ देण्याचा प्रयत्न करत आहोत. आमच्यासाठी वेलनेस म्हणजे केवळ उत्पादने नव्हे, तर आत्मविश्वास, क्षमता आणि दीर्घकालीन प्रभाव घडवणे आहे.

# केटीएम कप सीझन ३ ची मुंबईत दमदार सुरुवात



**मुंबई, २८ जानेवारी :** जगातील नंबर १ प्रीमियम मोटरसायकल ब्रँड असलेल्या केटीएमने मुंबईत केटीएम कप सीझन ३ च्या पहिल्या राऊंडसह यशस्वी आणि उत्साहपूर्ण सुरुवात केली. ही स्पर्धा भारतातील सर्वात मोठी सिंगल-मेक रेसिंग चॅम्पियनशिप असून, या सीझनमधील ही पहिली राज्यस्तरीय फेरी ठरली.

या पहिल्या राऊंडमध्ये १२० हून अधिक तरुण आणि महत्त्वाकांक्षी रेसर्सनी सहभाग घेतला. ज्यात रायडर्सनी विविध वेळेनुसार आयोजित राउंड्स आणि स्किल टेस्टमध्ये आपली राईडिंग क्षमता दाखवली. या कार्यक्रमाला केटीएम प्रेमी आणि मोटरस्पोर्ट चाहत्यांचा जोरदार प्रतिसाद मिळाला, ज्यामुळे परफॉर्मन्स रायडिंगसाठी मुंबई हे महत्त्वाचे केंद्र असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

दिवसभर चाललेल्या रोमांचक रेसनंतर सर्वोत्तम रायडर्सनी पुढील फेरीसाठी आपली जागा निश्चित केली. यामुळे ते केटीएम कप जिंकण्याच्या आणखी एक पाऊल जवळ पोहोचले.

मुंबई राउंडचा उत्साह आणखी वाढवण्यासाठी, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध केटीएम स्टंट रायडर रोक बागोरोस यांनी थरारक स्टंट सादरीकरण केले. त्यांच्या जबरदस्त प्रदर्शनाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले आणि हा रेस वीकेंड सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

या उत्साहात आणखी भर घालत, मोटो जीपीचे दिग्गज डॅनी पेड्रोसा क्वालिफायर आणि अंतिम फेरीदरम्यान रायडर्सशी संवाद साधणार आहेत. तसेच, सीझन ३ चे विजेते रायडर्सना ऑस्ट्रिया ग्रँड प्रिक्स पाहण्यासाठी सर्व खर्चासह सहल मिळणार असून, त्यात पिट एरियामध्ये प्रवेश आणि मॅटिगोफेन येथील केटीएम मोटोहॉल भेट यांचा समावेश असेल.

केटीएम कप भारतातील रेसिंगला प्रोत्साहन देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. यात आयोजित स्पर्धा, प्रोफेशनल प्रशिक्षण आणि समुदायाशी संवाद यांचा समावेश आहे. येत्या काही आठवड्यांत ४ शहरांमध्ये राऊंड्स होणार असून, केटीएम कप सीझन ३ रायडर्स आणि चाहत्यांसाठी थरारक आणि रोमांचक अनुभव ठरणार आहे.

# अदाणी डिफेन्स अँड एअरोस्पेस आणि एम्ब्रेअर यांनी भागीदारी जाहीर केली

**नवी दिल्ली, २८ जानेवारी :** भारतातील एअरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी आणि अदाणी एंटरप्राइजेस लिमिटेडची प्रमुख उपकंपनी असलेल्या अदाणी डिफेन्स अँड एअरोस्पेस आणि जागतिक एअरोस्पेस क्षेत्रातील अग्रणी कंपनी एम्ब्रेअर यांनी भारतात एकत्रित रिजनल ट्रान्सपोर्ट विमान उद्योग उभारण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. या भागीदारीद्वारे दोन्ही कंपन्या विमान निर्मिती, पुरवठा साखळी, विक्रीपश्चात सेवा आणि पायलट प्रशिक्षण या क्षेत्रांमध्ये एकत्र काम करणार आहेत.

ही औद्योगिक भागीदारी भारतात एक असेंब्ली लाईन उभारण्यावर लक्ष देईल आणि हळूहळू स्थानिक उत्पादन वाढवून भारताच्या रिजनल ट्रान्सपोर्ट विमान (आरटीए) कार्यक्रमाला पुढे नेईल. हे आत्मनिर्भर भारत उपक्रम आणि उडान रिजनल कनेक्टिव्हिटी व्हिजनशी सुसंगत असेल.

प्रादेशिक विमान वाहतूक हा आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. उडान सारख्या उपक्रमांमुळे टियर २ आणि टियर ३ शहरांमधील हवाई कनेक्टिव्हिटी बदलत आहे, त्यामुळे देशांतर्गत प्रादेशिक विमान वाहतूक उद्योगाची गरज आता खूप महत्त्वाची झाली आहे, असे अदाणी डिफेन्स आणि एरोस्पेसचे संचालक जीत अदाणी यांनी सांगितले.

अदाणी डिफेन्स अँड एअरोस्पेस ही भारतातील सर्वात मोठी एकात्मिक खाजगी संरक्षण आणि एरोस्पेस कंपनी आहे, जी विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण क्षमता निर्माण करत आहे आणि राष्ट्रीय सुरक्षा प्राधान्ये तसेच जागतिक गरजेनुसार देशांतर्गत एअरोस्पेस आणि यूएव्ही उत्पादनाला चालना देत आहे. देशातील सर्वात मोठा एमआरओ इकोसिस्टम (देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉल) आणि झपाट्याने वाढणारा पायलट प्रशिक्षण प्लॅटफॉर्म यामुळे अदाणी डिफेन्स भारताच्या एव्हिएशन मूल्य साखळीला सुरुवातीपासून शेवटपर्यंत सर्व बाजूंनी मजबूत करत आहे. त्याच्या विविधीकृत पोर्टफोलिओमध्ये विमान, अनमॅन्ड सिस्टम, एव्हिओनिक्स, शस्त्रे आणि मेंटेनन्स यांचा समावेश असून, कंपनी दीर्घकालीन क्षमता विकास आणि राष्ट्रीय आत्मनिर्भरतेच्या उद्देशाला धरून काम करत आहे.

# वाधवानी फाऊंडेशनने २०३० पर्यंत २.५ दशलक्ष रोजगार निर्माण करण्यासाठी आणि ६ दशलक्ष व्यक्तींना रोजगारासाठी भर केली

**नवी दिल्ली, २८ जानेवारी :** वाधवानी फाऊंडेशन ही उद्योजकता, कौशल्य, नाविन्यता व सरकारी डिजिटल परिवर्तनाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित करणारी जागतिक ना-नफा तत्त्वावर आधारित कंपनी भारतातील आपल्या विकासाच्या पुढील टप्प्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. फाऊंडेशन उत्तर प्रदेश, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र आणि तामिळनाडू या राज्यांमधील १५ प्राधान्यक्रमाच्या शहरांमध्ये आपली अंमलबजावणी प्रक्रिया अधिक दृढ करत आहे.

उत्तम अंमलबजावणीच्या माध्यमातून सर्वोत्तम परिणाम वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, जेथे राष्ट्रीय स्तरावरील प्लॅटफॉर्म्सचा स्थानिक स्तरावर प्रभाव घडवून आणण्याची खात्री घेतली जात आहे. उत्तम परिणामांमध्ये वाढ म्हणजे अधिकाधिक स्थानिक रोजगार निर्माण केले जातील आणि अधिकाधिक स्थानिक व्यक्तींना रोजगार दिले जातील. या दृष्टिकोनामुळे जलद अंमलबजावणी, स्पष्ट जबाबदारी, तसेच स्थानिक नियोक्ते, कौशल्य संस्था व रोजगार निष्पत्तींमधील समन्वय शक्य होते.

वाधवानी फाऊंडेशनचे सीईओ व बोर्ड सदस्य डॉ. अजय केला म्हणाले ''आमचे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करण्याचे आणि व्यक्तींच्या उदरनिर्वाहामध्ये वाढ करण्याचे मिशन आहे. २०२५ मधील प्रबळ पायाचा आधार घेत आम्ही २०२६ मध्ये भारतातील आमची गुंतवणूक वाढवत आहोत, तसेच आमची टीम देखील वाढवत आहोत, ज्यामुळे राज्य व शहरांमध्ये अंमलबजावणी अधिक उत्तम होईल. या पुढाकारामुळे निष्पत्तींना गती मिळेल, स्थानिक पातळीवर अधिक रोजगार निर्माण होतील आणि अधिकाधिक रोजगारासाठी सुसज्ज व्यक्तींना नोकऱ्या मिळतील. यासह आम्ही आमच्या २०३० ध्येयांच्या दिशेने वाटचाल सुरू ठेवू.''

प्रभाव निर्माण करण्यासह कायम राहणाऱ्या स्थानिक परिसंस्थांशी संलग्न होण्यावर लक्ष केंद्रित करत वाधवानी फाऊंडेशनने उद्योजकता, कौशल्य, एसएमबी विकास, नाविन्यता आणि सरकारी डिजिटल परिवर्तनामधील सर्व उपक्रमांप्रती आपली कटिबद्धता कायम ठेवली आहे.

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबलमध्ये राशी पुष्पावर विश्वास ठेवेल की ऋषभच्या कारस्थानाला बळी पडेल?

**मुंबई, २८ जानेवारी :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबलमधले नाट्य आता अधिकच तीव्र झाले आहे, कारण पुष्पा (करुणा पांडे) केवळ परिस्थितीशी झगडत नसून तिच्यात आणि तिची मुलगी राशी (अक्षया हिंदळकर) यांच्यातील वाढत्या दुराव्यामुळे ती अस्वस्थ झाली आहे. पुष्पाला सुरुवातीला राशीची चिंता वाटत होती, पण आता तिला राशीची काळजी वाटू लागली आहे की, ती सुरक्षित तर आहे ना? आणि तिचा नवरा ऋषभ (श्रेय मारडिया) तिला आपल्या जाळ्यात तर अडकवत नाहीये ना?

आगामी भागांमध्ये पुष्पाच्या मनातील भीती बळावत जाते. राशीला ती तिच्या खोलीत कोंडलेल्या स्थितीत आणि मग बेशुद्धावस्थेत पाहते. यावरून तिला ऋषभच्या विक्षिप्त स्वभावाची चाहूल लागते. पुष्पा आणि दिलीप राशीला मदत करण्यासाठी धाव घेतात. पुष्पाच्या मनात शंकेची पाल चुकचकते की काहीतरी भयंकर बिनसले आहे. पण ती हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा तिचा विरोध होतो. पुष्पा ऋषभ आणि मधुमतीला जाब विचारते, पण तिला राशीच्या जीवनातून निघून जाण्यास बजावले जाते. राशी बिचारी आपल्या आईला वाटणारी काळजी आणि पतीच्या भावनात्मक दबाव यांच्या कात्रीत सापडते आणि नाईलाजाने पुष्पाला निघून जायला सांगते. पुष्पा वाद वाढवण्याऐवजी संयमाने घेते आणि शांतपणे चौकशी सुरू करते. ऋषभची कारस्थाने वाढतच जातात. राशीवरील नियंत्रणाला तो प्रेम असे गोंडस नाव देतो आणि राशीवर भावनिक अत्याचार करत राहतो. पुष्पा ऋषभच्या घरात छुपे कॅमेरे बसवते ज्यामध्ये तिला अनपेक्षितपणे अस्थिर झालेला ऋषभ, बावरलेली राशी आणि चिराग एकाच छताखाली दिसतात. यातून मोठा प्रश्न उपस्थित होतो की, राशीला ऋषभचे खरे रूप दिसेल का? की पुष्पाने पुढाकार घ्यायला उशीर केला आहे?

राशी पटेलची भूमिका करणारी अक्षया हिंदळकर म्हणते, राशी संभ्रमात पडली आहे. तिला जे वाटते आहे आणि तिला जे पटवून दिले जात आहे यामध्ये अंतर असल्याने ती गोंधळून गेली आहे. तिचे आपल्या आईवर प्रेम आहे आणि ती हे जाणते की, पुष्पा काळजीपोटी चिंता करत आहे. दुसरीकडे ती ऋषभ आणि त्याचे वागणे यामुळे भांबावली आहे. तिचे जीवन सध्या या गोंधळात अडकले आहे. तिला आपले लग्नजीवन सांभाळायचे आहे पण आपल्या आसपास जे घडत आहे ते सामान्य आहे का हा प्रश्न तिला सतावतो आहे. राशी आत्ता अशा टप्प्यावर आहे की, तिचा एक निर्णय तिचे जीवन बदलू शकतो.

# सोनी सबवरील यादें मालिकेत वाणीची भूमिका करण्याबाबत सृष्टी सिंह म्हणते, मी पडद्यावर जेव्हा डॉक्टरचा स्क्रब घालते तेव्हा मी माझ्या पद्धतीने जणू माझ्या आई वडिलांचे स्वप्नच पूर्ण करते



**मुंबई, २८ जानेवारी :** सोनी सब लवकरच घेऊन येत आहे, एक मेडिकल ड्रामा हुई गुम यादें एक डॉक्टर, दो जिंदगियां. जीवनात दुसरी संधी देण्याची ही गोष्ट आहे. या मालिकेत डॉ. देव (इकबाल खान)चा असामान्य प्रवास दाखवला आहे. डॉ. देवची स्मृती रातोरात जाते, त्यामुळे जगच पालटून जाते. आणि मग स्वत:ची ओळख, नाती, भावना आणि निवडी नव्याने शोधण्याचा प्रवास सुरू होतो.

या कथानकात एक महत्त्वाची व्यक्तिरेखा वाणीची आहे. अभिनेत्री सृष्टी सिंह वाणीची भूमिका करत आहे. जीवनातले कठोर धडे पचवून वाणीचे व्यक्तिमत्व घडले आहे. वाणी लवचिक आहे, स्वत:च्या बळावर मोठी झाली आहे आणि आपल्या भावना व्यक्त होऊ न देण्याबाबत दक्ष असते. जीवनात खूप लवकर ती हे शिकली आहे की, भावनांच्या आधी आपले अस्तित्व जपणे महत्त्वाचे असते. सृष्टीसाठी वाणी ही काही सर्वसामान्य व्यक्तिरेखा नाही. ही अशी भूमिका आहे, जिच्याशी तिचे वैयक्तिक नाते आहे. ती स्वत: बायोलॉजीचीच विद्यार्थिनी होती आणि तिने डेन्टलची परीक्षा देखील उत्तीर्ण केली होती. त्यामुळे पडद्यावर तरुण डॉक्टरची भूमिका करताना तिच्या माता-पित्यांचेतिला डॉक्टर झालेली बघण्याचे स्वप्न जणू ती पूर्ण करत आहे.

ही भूमिका विशेष अर्थपूर्ण का आहे, याबद्दल सृष्टी सिंह म्हणते, माझ्या आई-वडिलांचीखूप इच्छा होती की मी डॉक्टर बनावे. हा प्रवास आणखी खास असण्याचे कारण म्हणजे, मी वैद्यकीय प्रवेश परीक्षा दिली होती, आणि डेन्टल डिग्री करण्याची संधी मला मिळाली होती. पण जीवन मला अभिनयाकडे घेऊन आले. पण तरीही मला आईवडिलांचे स्वप्न साकार होण्यासाठी काहीतरी करावे असे वाटत होते. मी जेव्हा पडद्यावर स्क्रब घालते, तेव्हा मला वाटते की मी जणू माझ्या पद्धतीने त्यांचे स्वप्न साकार करत आहे. वाणीची भूमिका करणे माझ्यासाठी एक भावनिक अनुभव आहे, कारण तिची जडणघडण देखील लवचिकता, महत्त्वाकांक्षा आणि तत्त्वं यांनी झाली आहे. तिच्या माध्यमातून मला डॉक्टरचे जीवन अनुभवण्याची संधी मिळाली आहे. ते जीवन जे मी पूर्वी जवळजवळ निवडले होते. आणि त्यामुळे ही भूमिका माझ्यासाठी वैयक्तिक पातळीवर विशेष आहे.

# राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य जाईल. अनावश्यक चिंतांपासून मुक्त व्हाल. आज सहलीला जाण्याची शक्यता आहे, तिथे जपून रहा, तब्येत सांभाळा. मन समाधानी असेल.

**वृषभ :** आज तुमचे विचार सकारात्मक ठेवा. तुम्ही ऑफिसमधील प्रलंबित कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल आणि तुम्हाला यश मिळेल. राजकारणात असलेल्यांना आज महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मिळतील.

**मिथुन:** विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु त्यांना अभ्यासात अधिक मेहनत घ्यावी लागेल. आज तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत वेळ घालवू शकाल, ज्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल.

**कर्क :** आज सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. तुम्हाला तुमच्या भविष्यातील योजनांवरही विचार करावा लागेल. कुटुंबातील सदस्य तुमची ध्येये साध्य करण्यास मदत करतील. आर्थिक व्यवहारात काळजी घ्या.

**सिंह:** महत्वाच्या कामात आज तुमच्या वडिलांचा सल्ला घेणं फायदेशीर ठरेल. अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. तुम्ही सामाजिक कार्यांना पाठिंबा द्याल, ज्यामुळे समाजात तुमची प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या :** आज तुमचे वरिष्ठ तुमच्या कामाची प्रशंसा करतील. तुम्हाला पगारवाढीची चांगलीबातमी देखील मिळेल, ज्यामुळे तुम्ही दिवसभर आनंदी राहाल. तुमच्या वरिष्ठांशी चांगला वागणं ठेवा.

**तुळ:** आज तुम्ही ज्याला भेटाल तो तुमच्यामुळे प्रभावित होईल. कोणाशीही बोलताना तुमच्या बोलण्यावर संयम ठेवा. आज तुम्ही तुमच्या करिअरबद्दल अनिश्चित असाल. अनुभवी व्यक्तीचा सल्ला आणि मार्गदर्शन घ्या.

**वृश्चिक :** आज तुम्हाला जुन्या गुंतवणुकीचा फायदा होईल. आर्थिक परिस्थिती सुधारेल. नियोजन करण्यासाठी आणि महत्वाचा निर्णय घेण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे.आर्थिक परिस्थिती सुधारेल.


**धनु :** व्यवसायासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो. तुमचे काम व्यवस्थित पूर्ण होईल. आज तुमच्या दैनंदिन जीवनात काहीतरी नवीन येऊ शकते. आज नेमलेली कामे वेळेवर पूर्ण करा.

**मकर :** आज तुम्हाला नवीन कामांमध्ये रस असेल. तुमचा व्यवसाय वाढण्याची शक्यता आहे. तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल. प्रेमात असलेल्या व्यक्तींसाठी आजचा दिवस चांगला असेल.

**कुंभ:** आज जपून रहा, तब्येत सांभाळा. आज तुम्ही काम आणि कौटुंबिक संबंधांमध्ये संतुलन राखाल. एखादे काम पूर्ण करण्यासाठी तुम्ही नवीन मार्गांचा विचार कराल. तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**मीन:** आज, रखडलेले व्यावसायिक प्रकल्प पुन्हा सुरू केल्याने तुमची व्यस्तता वाढेल. तुम्ही तुमचे पूर्ण लक्ष तुमची कामे पूर्ण करण्यावर केंद्रित कराल. प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी देखील हा दिवस चांगला आहे.

# शब्दकोडे क्रमांक २३३९



**उभे शब्द :-**

१) लांबत जाणारे काम
२) वाकण्याची क्रिया
३) ठेकेदार
४) हजार किलो
५) वजनदार पदार्थ उचलण्याचा वासा व दोरखंड
६) शेतकरी
७) चिखल
८) वणवा
९) निमग्न, तल्लिन
१२) कणीदार पीठ
१४) डासाचे चावणे
१६) रत्नाकर
१७) एक चतुर्थांश भाग
१८) मोठी उथळ वाटी
१९) मोठा डेरा
२०) मीठ
२१) समुद्रातील अग्नी
२३) श्रेष्ठ प्रतीचा
२६) बी, रोपे पेरण्याची क्रिया
२८) सरसकट
२९) पाणी
३१) सुसंस्कृत
३४) मृत्यू नसलेला
३७) ताटी
३९) शेळी
४१) काटा, तराजू
४२) खूप मोठे पोट असलेला
४४) निवासस्थान
४७) घाण
४९) आपल्या मताशी ठाम असलेला, कट्टर
५०) कप्तान, कॅप्टन
५१) युवक
५२) दयाळू
५४) पर्जन्यकाळ
५५) मत्स्य
५७) बयाणा
५९) माया, प्रेम
६१) मनुष्य
६२) विळखा, मिठी
६३) बाण
६४) अंत:करण.

**आडवे शब्द :-**

१) जबरदस्तीने, जुलूमाने
६) भाडेकरु (हिं.)
१०) घर (हिं.)
११) तुषार
१३) कडक व चिवट
१५) नदीचा काठ
१६) लाकडाची एक उत्कृष्ट जात
१७) पर्ण
१८) रणांगण
२०) जलद व चपळाईने वाकणे
२२) अंत, अखेर
२४) सोन्याचा धागा
२५) सरोवर
२७) नदीचे प्रमाणाबाहेर वाढलेले पाणी
२८) उत्सव
३०) मोजणी, गणती
३२) बातमी
३३) दारावरील खूणेचा आवाज
३४) शेराचा आठवा भाग
३५) जाणे
३६) रायगडावरील एका कड्याचे नाव
३८) दगडाचा एक प्रकार
४०) वेल, वल्लरी
४३) मंदवासर
४५) बैलाच्या मानेवरील जोखड
४६) दारुचा एक प्रकार
४८) बाजू, शेवट
४९) नवा कोरा
५२) औषध
५३) लाटण्याचा जोडीदार
५५) नारळाचे झाड
५६) भारतीय चलन
५७) विश्रांती, आराम
५८) सापाची एक जात
६०) पत्नी
६२) जेमतेम
६३) लाज
६४) चिंतन
६५) आंबट, तुरट चवीचे फळ
६६) रविवासर
६७) मारणे, चोपणे.

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# दमदार आणि दिलदार मित्र मला सोडून गेला...

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केल्या भावना

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :** अजित पवार हे महाराष्ट्राचे लोकनेते होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला, महाराष्ट्राच्या प्रश्नांची जाण असलेला अशा प्रकारचा हा नेता होता. अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्या निधनावर भावना व्यक्त केल्या आहेत.



ज्याच्याबद्दल जनसामान्यांमध्ये प्रचंड आस्था होती. अजित दादा हे अतिशय संघषार्तून तयार झालेले अशा प्रकारचे नेतृत्व होते. कोणत्याही परिस्थितीमध्ये न डगमगता पुढे जाणारे व्यक्तिमत्व होतं. महाराष्ट्राकरता आजचा दिवस अतिशय कठीण दिवस आहे. अशा प्रकारचे नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्षे लागतात, असे देखील फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्राच्या विकासामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण योगदान अजित पवार देत होते. अशा काळामध्ये त्यांचे निघून जाणे हे अविश्वसनीय आहे. मनाला चटका लावणारे आहे. वैक्तिगत माझ्याकरता एक दमदार आणि दिलदार अशा प्रकारचा मित्र मला सोडून गेलेला आहे. त्यांच्या कुटुंबावर देखील हा प्रचंड मोठा आघात आहे.

सकाळपासूनच मी सर्वांच्या संपर्कात आहे. माननीय प्रधानमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्री सर्वांशी चर्चा करून त्यांनाही घडलेल्या सर्व परिस्थितीची कल्पना दिलेली आहे. त्यांनी याबद्दल प्रचंड दुःख व्यक्त केलेले आहे.

संपूर्ण देशातच या सर्व प्रकरणामुळे हळहळ पसरली आहे. अजित पवार यांच्या कुटुंबाशी चर्चा करून पुढच्या सर्व गोष्टी ठरविण्यात येतील. सकाळी सुप्रिया सुळे यांच्याशी बोलणं झालं आहे. तसेच पार्थ पवार यांच्याशी देखील चर्चा झाली आहे. संपूर्ण पवार कुटुंब बारामतीला पोहोचल्यानंतर त्यांच्या संमतीने पुढचे निर्णय घेतले जातील. बारामती मध्ये शासकीय सुट्टी घोषित करण्यात आली आहे. तसेच राज्यात तीन दिवसाचा दुखावटा जाहीर करण्यात आलेला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**विश्वास ठेवायलाच मन तयारच नाही**

कधीही भरून न निघणारे नुकसान महाराष्ट्राचे झाले आहे. अशा प्रकारचे लोकनेते गेल्यानंतर जी पोकळी निर्माण होते, ती भरुण काढणे कठीण आहे. अतिशय संघर्षाच्या काळात आम्ही सोबत काम केलेले आहे. या गोष्टीवर विश्वास ठेवायलाच मन तयारच होत नसल्याचेही फडणवीस यांनी म्हटले आहे.

# डोंगराएवढे दुःख, मोठा भाऊ हरपला..

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कमालीचे हादरले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे मला माझा मोठा भाऊ हरपल्याचे दुःख झाले आहे, अशी भावना सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

अजित पवार वयाने मोठे होते. आम्ही राजकारणात एक टीम म्हणून काम करत असलो तरी, एक मोठा भाऊ हरपल्याची भावना माज्या मनात निर्माण झाली आहे. हे डोंगराएवढे दुःख पचवण्याची क्षमता ईश्वराने त्यांना प्रदान करावी, असे ते म्हणाले.

**करतो, बघतो, पाहतो, हे शब्दच अजित पवारांच्या डिक्शनरीत नव्हते**

एकनाथ शिंदे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, अजित पवार चुकीला चूक म्हणत होते. ते मनाने अतिशय निर्मळ होते. त्याचा अनुभव मी स्वतः घेतला. त्यांच्यासोबत मी मंत्रिमंडळातही काम केले. मी मुख्यमंत्री असताना त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम केले.

सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली तेव्हा अजित पवारांनी या योजनेसाठी आर्थिक तरतूद करण्याचे उत्कृष्ट काम केले. त्याचा अनुभव मला आहे. एकदा करायचे ठरवले की ते करायचेच. करतो, बघतो, पाहतो असे शब्द त्यांच्या डिक्शनरीत नव्हते. होत नसेल तर होणार नाही असे ते ठामपणे सांगायचे. असा स्पष्टवक्तेपणा या महाराष्ट्राने पाहिला.

मी असेन. मुख्यमंत्री असतील. अजित पवार असतील. आम्ही टिम म्हणून काम केले. आमच्या कामाच्या वेळाही वेगवेगळ्या होत्या. मी रात्री उशिरापर्यंत काम करतो. दादा पहाटे लवकर उठून कामाला लागत होते. देवेंद्र दिवसभर काम करतात.



**विमान अपघाताची चौकशी होणार!**

या अपघातात आमच्या सहकाऱ्याचा मृत्यू झाला. ५ जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे या विमान अपघाताची चौकशी झाली पाहिजे. ती नक्कीच होईल. कारण, यापुढेही अशा प्रकारचे अपघात होता कामा नये यासाठी हे गरजेचे आहे. त्यासाठी त्याची चौकशीही होईल. राज्य आणि केंद्र सरकार तसेच डीजीसीए याप्रकरणी काम करीत असल्याचेही शिंदे यावेळी म्हणाले.

ते पुढे म्हणाले, अजित पवारांनी पहाटे ६ वा. वेळ दिल्याचे अधिकाऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी पाहिले आहे. अतिशय वेळेचे महत्त्व व वेळेचे भान ठेवणारा नेता हरवलेला आहे. खरे म्हणजे काल परवाच सरन्यायाधीशांसोबतच्या एका कार्यक्रमात आमची भेट झाली. ते येण्यापूर्वी आम्ही तिथेच एका चेंबरमध्ये बसलो होतो. त्यावेळी झालेल्या चर्चा, गप्पा, गोष्टी आज मला त्यांच्या अपघाताची बातमी कळली तेव्हा डोळ्यासमोरून गेल्या.

अजित पवार माझ्यापेक्षा वयाने व राजकारणाने मोठे होते. त्यांना राज्यातील अनेक विषयांचा गाढा अभ्यास होता. त्यांनी अनेक विषय हाताळले होते. त्याचा राज्याला फायदा होत होता. मंत्रिमंडळात देखील ज्यावेळी काही विषय यायचे त्यावेळी आपल्य राज्याची आर्थिक परिस्थिती अशी अशी आहे, आपल्या सर्वांना काटकसर करावी लागेल असे ते निर्भिडपणे सांगत होते.

शिस्तिचा नेता म्हणूनही त्यांना अनुभवले. त्यामुळे त्यांच्या जाण्याने केवळ पवार कुटुंबीयांचेच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचे न भरून येणारे नुकसान झाले आहे.

अजित पवार माझ्यापेक्षा वयाने मोठे होते. आमच्यात गत काही वर्षांपासून फार जवळीक निर्माण झाली होती. आम्ही राजकारणात एक टीम म्हणून काम करत असलो तरी सुद्धा एक मोठा भाऊ हरपल्याची भावना माझ्या मनात निर्माण झाली आहे. मी त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहतो.

मनात दुःखाच्या फार भावना आहेत. त्यांच्या कुटुंबीयांना हे डोंगराएवढे दुःख पचवण्याची क्षमता ईश्वराने त्यांना प्रदान करावी. हे कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे झालेले नुकसान आहे. मी व मुख्यमंत्री आम्ही बारामतीला जात आहोत.

आम्ही सरकार म्हणून जे काही निर्णय घ्यायचो ते मिळूनच घ्यायचो. एखादी सूचना आली की, त्याला तिघांनी बळ देऊन ते पूर्ण करायचो. अजित पवार कधीकधी असेही म्हणायचे की, नव्या योजनांमुळे आपल्याला काटकसर करावी लागेल. पण जेव्हा काही निर्णय आपल्याला जेव्हा घ्यावेच लागत होते तेव्हा ते मागे हटत नव्हते, याचा अनुभवही आम्ही घेतला आहे.

# दादांना मान्यवरांची भावपूर्ण श्रद्धांजली

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर / मुंबई, दि. २८ :**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज बुधवारी सकाळी बारामतीनजिक एका विमान अपघातात निधन झाले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र सून्न झाला असून, सर्वत्र शोककळा पसरली आहे. अजित पवार यांच्या निधनावर सर्व स्तरातून शोक व्यक्त केला जात असून, देशभरातील नेत्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत.



**नितीन गडकरी**
मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग
भारत सरकार

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार जी यांच्या अपघाती निधनाचे वृत्त अतिशय धक्कादायक, दुर्दैवी आणि दुःखद आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. गेली अनेक वर्षं राज्याच्या विधिमंडळात सोबत काम करताना अजितदादांशी अतिशय जवळचा संबंध राहिला आहे.

त्यांचे प्रशासनिक कौशल्य, विकासात्मक दृष्टिकोन आणि लोकांना जोडण्याची हातोटी यांमुळे अजितदादांचे कायमच महाराष्ट्राच्या राजकारणात एक अढळ स्थान राहिले आहे. महाराष्ट्राच्या विकासाची आकांक्षा असलेल्या या लोकनेत्याचे अकाली निधन होणे, ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर संपूर्ण देशाची कधीही भरून न निघणारी हानी आहे. या दुःखद प्रसंगी संपूर्ण पवार कुटुंबीयांसोबत माझ्या संवेदना आहेत. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती प्रदान करो.

---

मला आज सकाळी या दुःखद घटनेबद्दल समजले... ते जवळपास २० वर्षे आमच्यासोबत काम करणारे आणि आमच्यासोबत राहिलेले सहकारी होते. जेव्हा मी मुख्यमंत्री होतो, तेव्हा त्यांनी माज्या मंत्रिमंडळातही काम केले होते. ते एक अत्यंत सज्जन, मनमिळाऊ आणि सर्वांना मदत करणारे कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते... त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात स्वतःचे नाव कमावले... त्यांना जे काही काम दिले गेले, ते त्यांनी मनापासून, विचारपूर्वक आणि पूर्ण निष्ठेने केले. विशेषतः, त्यांनी गरीब, शेतकरी आणि सहकारी क्षेत्रासाठी केलेले काम विसरता येणार नाही... हे एक मोठे नुकसान आहे, ज्याची भरपाई होऊ शकत नाही. मी माझ्या संवेदना व्यक्त करतो.

**सुशीलकुमार शिंदे**
**माजी मुख्यमंत्री**

---

अजित पवार यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा आहे. अजित पवारांसोबत मी विरोधीपक्ष नेता म्हणून आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले. त्यांच्यासोबत काम करताना आलेला अनुभव आयुष्यभर लक्षात राहील असा आहे. अजित पवार सत्तेत असताना, त्यांच्यावर टीका टिपण्णी करूनही, त्यांच्याकडे कामानिमित्त गेल्यावर त्यांनी कधीही आकस न ठेवता जनतेचे काम मनापासून करायचे.

**अंबादास दानवे**

---



एका दुःखद अपघातात आपण अजित दादांना गमावले आहे, हे ऐकून मला खूप मोठा धक्का बसला आहे आणि मन सुन्न झाले आहे. महाराष्ट्राच्या सर्वात गतिमान नेत्यांपैकी एक असलेले अजित दादा कामात हलगर्जीपणा अजिबात सहन करत नव्हते आणि ते आपल्या सभोवतालच्या लोकांना उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी सतत प्रेरित करत असत. ते स्पष्टवक्ते होते, त्यांची विनोदबुद्धी अतुलनीय होती आणि संपूर्ण राज्यात ते सर्वांचे लाडके होते. त्यांच्या अकाली निधनामुळे एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे, जी कधीही भरून येणार नाही. मला त्यांच्याशी अनेकदा संवाद साधण्याची संधी मिळाली, आणि त्यांनी माज्यावर केलेल्या प्रेमाबद्दल मी त्यांना नेहमीच स्मरणात ठेवीन. पवार कुटुंब, त्यांचे प्रियजन आणि लाखो समर्थकांप्रति मी माझ्या मनःपूर्वक संवेदना व्यक्त करतो.

**अभिनेता रितेश देशमुख**

---

अजित पवार यांच्या अचानक झालेल्या निधनाने मला खूप धक्का बसला आहे. अजित पवारांची काम करण्याची एक स्वतःची वेगळी आणि शिस्तबद्ध शैली होती, हे नाकारता येणार नाही. त्यांच्या पत्नी, कुटुंब, मित्र आणि पक्षाच्या दुःखात मी सहभागी आहे. या भीषण विमान अपघातात अजित पवारांसह इतर ४ जणांनाही आपले प्राण गमवावे लागले आहेत. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रकाश आंबेडकर यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, ज्या विमान अपघातात ५ जणांचा बळी गेला, त्या घटनेची अत्यंत योग्य आणि सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

**ॲड. प्रकाश आंबेडकर**

---

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात संशयास्पद आहे. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि मानवाधिकार आयोगामार्फत याची चौकशी होणे आवश्यक आहे, की विमान जाणूनबुजून सदोष ठेवले होते की त्यात काही तांत्रिक बिघाड होता की हा काही राजकीय कट होता? याची सीबीआयमार्फत चौकशी व्हायला हवी.

**ॲड. नितीन सातपुते**

---

एक धाडसी, अभ्यासू व राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी दिवसरात्र धडपडणारा बहूआयामी असा नेता आज आपण गमावला आहे. कालच माझी वसईच्या विकासकामासंदर्भात त्यांच्याशी भेट झाली होती. राज्याच्या विकासाचे व्हिजन कायम उराशी बाळगणाऱ्या नेत्याचे असे अकाली जाणे, फार क्लेशकारक आहे. त्यांची काम करण्याची पद्धत इतरांना मार्गदर्शक ठरणारी होती. मला त्याचे सुखद असे दोन अनुभव आले. रोजगार हमी योजनेवरील मजुरांची मंजुरी थकल्याची बाब मी आपल्या भाषणात सभागृहात मांडली असता दादा यांनी त्वरित मजुरांची १४ कोटीची रक्कम देण्याचे आदेश दिले.

दुसरा अनुभव आला तो मला भाषणासाठी कमी वेळ मिळाला होता, म्हणून मी मला अधिक वेळ मिळावा अशी मागणी करत होती. त्यावेळी दादा यांनी मला मध्येच थांबवून सभापतींना सांगितले की, तीला बोलू द्या, वेळ वाढवून द्या, आणि मला माझे म्हणणे मांडायला पूरेसा अवधी मिळाला. अशी थोर व्यक्ती आज आपल्यातून निघून गेली आहे. हे राज्याचे कधीही न भरून येणारे नुकसान आहे.

**स्नेहा दुबे पंडित**
**आमदार, वसई विधानसभा मतदारसंघ**

---

महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान झाले असून आपण एक दूरदर्शी नेता गमावला आहे. राज्याच्या विकासासाठी कायम धडपणारे अशी एक असामान्य व्यक्ती होती. गेल्या वर्षभरात सभागृहात त्यांनी केलेली अभ्यासपूर्ण भाषणे आम्हासाठी प्रेरणादायी होती. वसई विरारची प्रलंबित कामे मार्गी लागावीत,यासाठी, त्यांची आम्हाला खूप मदत होत होती.

**राजन नाईक**
**आमदार, नालासोपारा मतदारसंघ**

पान १ वरून....

# मुख्यमंत्री अजितदादा, अलविदा...!

झालेला खर्च मी माझ्या वैयक्तिक खिशातून केला आहे, हे तुम्हाला सांगायचे होते, आणि तुम्ही काम चांगले केले, त्याबद्दल तुमचे अभिनंदन करायचे होते, म्हणून तुम्हाला जेवायला बोलावले. दादाचे ते बोलणे ऐकून आम्ही एकदम शांत झालो. नाहीतर नेहमी राजकीय मंडळी त्यांच्यावर आलेले आर्थिक ओझे दुसऱ्यावर टाकतात, हे नवे नाही.

दादांच्या पुढाकारातून पुण्यात सारथी हा उपक्रम सुरु झाला आणि अशोक काकडे नावाच्या अधिकाऱ्याने दादांचे स्वप्न साकार केले. ह्यसारथीह्नने बहुजनांच्या शेकडो मुलांना लाल दिव्याची गाडी दिली. असे अनेक उपक्रम दादांच्या नावे आहेत ज्यांचा इतिहास झाला आहे.

दादांच्या पारदर्शकतेला आणि प्रामाणिकपणाला कोणीही आव्हान देऊ शकत नाही. राजकारणात ते जितके कणखर होते, तितकेच आपल्या माणसांच्या बाबतीत हळवे आणि निष्ठावंत होते. ज्यांना दादा कळाले, ते त्यांच्यासोबत सावलीसारखे राहिले आणि ज्यांना त्यांचा फटकळपणा किंवा कामाचा 'फॉलोअप' झेपला नाही, ते दूर गेले. जे दूर गेले तेही आज दादांच्या जाण्याच्या वार्तेने ढसाढसा रडताना आपण पाहिले.

दुसरा एक किस्सा त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाची साक्ष देतो. माझ्या पुण्यातील 'सारथी'वरील विजयी भव पुस्तकाचे प्रकाशन पुण्यातील सारथीच्या सभागृहात दादांच्या हस्ते झाले. सकाळी आठची वेळ असूनही सभागृह खचाखच भरले होते. दादांनी भाषणात पुस्तकाचे खूप कौतुक केले. दादा कार्यक्रमातून बारामतीला गेले. कार्यक्रमानंतर दीड तासांनी मला दादांचा फोन आला. ते म्हणाले, संदीप पुस्तक फार छान झाले, जसे सारथीवर हिंदी, मराठी, इंग्रजी भाषेत पुस्तक केले, तसेच पुस्तक बारामतीमधील कलाशिल्पांवर आणि नवनवीन वास्तूंवर लिहून द्याल का? मी आनंदाने होकार दिला. प्रत्येक गोष्टीला हेरायचे, त्यात बारकावे शोधायचे आणि ते समाजोपयोगी कसे ठरतील यासाठी पुढाकार घ्यायचा, हा दादांचा हातखंडा होता.

प्रशासनात आणि पक्षात त्यांचा असलेला दरारा कमालीचा होता. संपूर्ण राष्ट्रवादी पक्ष समर्थपणे चालवून महाराष्ट्राच्या सत्तेच्या चाव्या आपल्या हाती असाव्यात, ही त्यांची इच्छा अखेरपर्यंत अधुरीच राहिली. त्यांनी दुसरा राष्ट्रवादी पक्ष उभा केला, पण मनातील दुफळीची सल त्यांना कायम टोचत राहिली. ज्या कार्यकर्त्यांनी आपली हयात एकाच विचारात घालवली आणि केवळ दादांच्या शब्दाखातर ते त्यांच्यासोबत आले, त्यांच्या आयुष्यात दादांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. या निमित्ताने संजय मिस्कीन सारख्या अनेक निष्ठावान ज्येष्ठ पत्रकारांचे,मोठे पदाधिकारी यांचे चेहरे माज्या समोर येत आहेत. यांचे आता पुढे काय होणार? जे समाजासाठी, पक्षासाठी ह्यदादामयह्न होते, असा प्रश्न पडतोय. अख्खा राष्ट्रवादी पक्ष आपल्या खांद्यावर असावा आणि त्याच पक्षाच्या माध्यमातून

काळानुरूप त्यांनी स्वाभिमानी विचारांचा दुसरा राष्ट्रवादी पक्ष उभा केला खरा, पण घरातील आणि पक्षातील, युतीमधील दुफळीचे शल्य त्यांच्या मनाला कायम बोचत राहिली. दुसरा महत्वाचा विषय म्हणजे मुख्यमंत्रीपद! सहा वेळा राज्याचे उपमुख्यमंत्री राहिलेला हा माणूस आज ना उद्या राज्याचा मुख्यमंत्री होईल, हे स्वप्न उराशी बाळगून जगणाऱ्या त्या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या मनातील वेदना आज शब्दांत मांडता येणार नाहीत. ज्यांनी आपली उभ्या आयुष्याची कमाई एका पक्षासाठी खर्च केली आणि केवळ दादांच्या एका शब्दाखातर नव्या वाटेवर चालले, त्यांच्या राजकीय प्रवासाचा या घटनेने जणू अश्वत्थामा झाला आहे.

उद्या काय होईल? पार्थ पवार यांच्याकडे पक्षाची धुरा येईल? दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा सुतळीसारख्या एकत्र विणल्या जातील? शरद पवार निवृत्ती जाहीर करून 'आता भांडू नका, हे सूत्र तुम्ही सांभाळा' असे म्हणतील? सुप्रियाताईकडे केंद्राची पूर्ण जबाबदारी येईल? हे सगळे 'जर-तर'चे खेळ आज गौण वाटतात. सत्य हेच आहे की, आज महाराष्ट्र एका अशा नेतृत्वाला मुकला आहे, ज्याची जरब आणि प्रशासकीय पकड प्रत्येकाला हवीहवीशी वाटत होती. आज केवळ बारामती पोरकी झाली नाही, तर मुख्यमंत्र्यांच्याही दोन पावले पुढे जाऊन अहोरात्र काम करणारा एक 'शिस्तबद्ध कर्मयोगी' गेल्यामुळे देशाच्या राजकारणातही एक रितेपण आणि नैराश्य दाटून आले आहे.

विखुरलेली राष्ट्रवादी पुन्हा एकसंध होऊन त्याच जोमाने कार्य करेल, हीच आता अपेक्षा आहे. ज्या उदात्त भावनेने आणि ध्येयाने अजितदादांनी महाराष्ट्रासाठी स्वतःला झिजवले, तेच कार्य पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. ज्या ज्या कार्यकर्त्यांना, नेत्यांना दादांनी राजकारणात शब्द दिला होता, त्या प्रत्येक शब्दाचा सन्मान राखला जाणे आणि त्यांच्या वारशाचा योग्य गौरव होणे, यातच त्यांच्या आत्म्याचे समाधान असेल. माणूस किती काळ जगला यापेक्षा, तो आपल्या स्वाभिमानासाठी आणि माणसांसाठी कसा जगला, यालाच इतिहास साक्ष देतो. अजितदादांनी आपल्या कर्तृत्वाने तो इतिहास सुवर्ण अक्षरात कोरला आहे.

आता 'जर-तर'च्या गोष्टी करण्यात अर्थ नाही. भविष्यात काय होईल, कोण पक्षाची कमान सांभाळेल, हे काळच ठरवेल. पण आज हा महाराष्ट्र अशा एका माणसाला मुकला आहे, ज्याचे कणखर नेतृत्व प्रत्येकाला हवेहवेसे वाटत होते. आज केवळ बारामती किंवा महाराष्ट्रच पोरका झाला नाही, तर देशाच्या राजकारणात एक शिस्तबद्ध आणि कर्तृत्ववान अध्याय संपल्याने कमालीची उदासीनता दाटून आली आहे.

माणूस किती वर्षे जगला यापेक्षा तो कसा जगला आणि माणसांसाठी किती जगला, यालाच खरे महत्त्व आहे. अजितदादा आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत एखाद्या वाघासारखे जगले. राजकारणातील हा 'मोठा दादा' आज गेला असला, तरी समाजकारणावर असलेला त्यांचा धबधबा सदैव कायम राहील.

अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली...!

(लेखक हे महासागर मिडियाचे मुख्य समूह संपादक आहेत.)

# कालची दादांची शेवटची भेट...

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २८ :** महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री, माझे ज्येष्ठ मित्र आदरणीय अजितदादा पवार यांच्या बारामती येथील विमान अपघातातील दुर्दैवी निधनाच्या बातमीने मी अक्षरशः हादरून गेलो आहे. मन सुन्न झाले आहे. या दुःखद बातमीवर अजूनही विश्वास बसत नाही.



महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला दिशा आणि गती देणारे लोकनेते म्हणून अजितदादांचे व्यक्तिमत्त्व कायम स्मरणात राहील.

प्रशासनावरची त्यांची मजबूत पकड, कामाचा अफाट वेग आणि लोककल्याणाचा अखंड ध्यास या सा?यांमुळे त्यांनी जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. अजितदादांचा प्रशासनातील अनुभव अतिशय समृद्ध होता. अनेकदा मी स्वतः त्यांच्याकडून सल्ला घेत असे, विविध विषयांवर त्यांच्याशी हक्काने चर्चा करीत असे. महायुतीत कार्य करत असताना अनेक प्रश्नांवर मोकळेपणाने संवाद साधण्याची त्यांची शैली मला नेहमी प्रेरणा देणारी वाटली. त्यांच्या सहवासातून मी स्वतः अनेक गोष्टी शिकलो.

अजितदादांचे जाणे हे केवळ एका नेत्याचे जाणे नाही; ते महाराष्ट्रावर कोसळलेले एक मोठे संकट आहे. देशाने एक दूरदृष्टीसंपन्न नेता गमावला आहे आणि मी माझा एक जिवलग ज्येष्ठ मित्र! अजितदादा आता आपल्यात नाहीत ही जाणीव अजूनही मनाला स्वीकारता येत नाही.

अजितदादांसह या अपघातात मृत्युमुखी पावलेल्या सर्वांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो. त्यांच्या कुटुंबीयांच्या, आप्तस्वकीयांच्या आणि कार्यकर्त्यांच्या दुःखात मी मनापासून सहभागी आहे.

# दादांच्या अकाली निधनाने मोठे नुकसान : अनिल देशमुख

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :** राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना अजितदादांच्या निधनाची बातमी समजली. तेव्हा त्यांना सुद्धा अश्रू अनावर झाले. त्यांनी दादांसोबत काम केलेल्या अनेक आठवणी माध्यमांशी बोलताना शेअर केल्या.



दादांच्या अकाली निधनाने महाराष्टाचे मोठे नुकसान झाले असून, ते भरून निघणारे नाही, अशी प्रतिक्रिया दिली.

# उद्धवस्त झालो : सुप्रिया सुळे

■ **वृत्तसंस्था, बारामती, दि. २८ :** अजितदादांच्या निधनाची वार्ता समजताच सुप्रिया सुळे यांनी उद्धवस्त झालो, अशी दोन शब्दात प्रतिक्रिया दिली. दुसरीकडे, युगेंद्र पवारांना अश्रू अनावर झाले.



अजित पवारांच्या विमानाला अपघात झाल्याचे समजताच त्यांच्या बहीण सुप्रिया सुळे, पत्नी सुनेत्रा पवार या दिल्लीहून तात्काळ बारामतीकडे रवाना झाल्या. सुप्रिया सुळे यांनी व्हॉटसअप स्टेटस ठेवून आम्ही उद्धवस्त झालो आहोत, अशा भावना व्यक्त केल्या.

# काळा दिवस ठरला... सुनील तटकरे

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** आमचे नेते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने आम्ही आमचा कुटुंबप्रमुख गमावला आहे. त्यांचे आकस्मिक निधन हे धक्कादायक आणि मन पिळवटून टाकणारे आहे. त्यांच्या निधनाने एक कुशल प्रशासक, अभ्यासू, रोखठोक आणि सदैव ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करणारे कर्तृत्ववान नेतृत्व हरपले आहे अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी शोक व्यक्त केला आहे.



ज्या-ज्या वेळी आमची भेट झाली, त्या प्रत्येक वेळी दादा हे शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांवर ठाम राहूनच काम केले पाहिजे, यावर भर द्यायचे. महाराष्ट्रातील सामान्य नागरिकांपर्यंत सरकारच्या योजना पोहोचल्या पाहिजेत, ही त्यांची कायमची आग्रही भूमिका होती. शेतकऱ्यांप्रती असलेली त्यांची तळमळ आणि संवेदनशीलता मी अगदी जवळून अनुभवली आहे, माझ्या वैयक्तिक तसेच सार्वजनिक जीवनात अजितदादांचे मार्गदर्शन, विश्वास आणि पाठबळ मला सदैव लाभले. कठीण निर्णयांच्या प्रसंगी त्यांची स्पष्ट व ठाम भूमिका, प्रशासनावरची मजबूत पकड आणि कार्यकर्त्यांप्रती असलेली आपुलकी आम्हा सर्वांसाठी नेहमीच दिशादर्शक ठरली, असे तटकरे म्हणाले. ०

# कल्पनेच्या पलीकडे घडले...

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :** विजय वडेट्टीवार म्हणाले की, 'अजित दादा हे राजकारणात शब्द पाळणारे कुशल प्रशासक होते. जे होणार नाही ते स्पष्ट सांगणार. जे होणार ते काम करणार असे स्पष्टवक्ता नेता होते. त्यांच्याबरोबर कॅबिनेट मंत्री म्हणून काम केले. २५ वर्ष त्यांच्याबरोबर काम केले. आज महाराष्ट्राच्या मातीतला मोठा नेता गमावला आहे. कल्पनेच्या पलीकडचे हे घडले आहे. एका लोकनेत्याला महाराष्ट्राने गमावले आहे.'



# महाराष्ट्राने एक उमदा नेता गमावला..

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** राज ठाकरे यांच्या पोस्टमध्ये त्यांनी अजित पवारांच्या व्यक्तिमत्वाचा आदर व्यक्त केला असून, त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एक पोकळी पसरल्याचे जाणवत आहे, असेही राज ठाकरे यांनी नमूद केले.



# दादांशिवाय राज्याचे राजकारण 'बेचव' आणि 'आळणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :** आज महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील काळा दिवस आहे. अजित पवार यांच्यासारखा कार्यक्षम आणि रोखठोक नेता आपल्यातून निघून गेला आहे. त्यांच्याशिवाय महाराष्ट्राचे राजकारण आणि समाजकारण आता 'बेचव' आणि 'आळणी' होईल. त्यांचे मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न अधुरेच राहिले, अशा अत्यंत भावूक शब्दांत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनावर शोक व्यक्त केला.

संजय राऊत म्हणाले, आज सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मुंबईतून बारामतीला घेऊन जाणाऱ्या विमानाच्या अपघाताची बातमी कळली, तेव्हा आम्ही सगळे प्रार्थना करत होतो की अशी कोणत्याही प्रकारची बातमी कानावर येऊ नये आणि अजित पवार सहीसलामत अपघातातून बाहेर यावेत. पण दुःखद बातमी आमच्या कानावर आली.

**संजय राऊत यांची भावूक प्रतिक्रिया**



अजित पवार यांच्याशिवाय महाराष्ट्रातील राजकारण आणि समाजकारण बेचव आणि आळणी होईल. त्यांचे व्यक्तिमत्व दिलखुलास, रोखठोक, कार्यकर्त्यांना हवाहवासा वाटणारा नेता असे होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

अजित पवारांच्या कामाची पद्धत, प्रशासनावरची पकड या सगळ्या गोष्टी महाराष्ट्राच्या मनात कायम राहतील. बारामती आणि त्यांचे एक नाते होते आणि त्याच बारामतीत त्यांना मृत्यू यावा, हा विचित्र योगायोग आहे. अजित पवारांना कधी श्रद्धांजली वाहावी लागेल, असे कधीही मनात आले नाही.

शरद पवारांनी त्यांना राजकारणात आणले आणि नंतर गेल्या दोन अडीच वर्षांपासून त्यांनी महाराष्ट्रात शरद पवारांशिवाय राजकारण सुरू केले. त्या राजकारणाचा असा अकाली अंत होईल, असे कोणच्याही ध्यानीमनी नव्हते, अशा भावना संजय राऊत यांनी व्यक्त केल्या.